सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३० ऑक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३० ऑक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# दिवंगत नेते रा. सू. गवई स्मारकाचे थाटात उद्घाटन

## मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती









**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल, रिपब्लिकन चळवळीचे ज्येष्ठ नेते दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या भव्य स्मारकाचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या शुभहस्ते स्मारकाचे लोकार्पण झाले. या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा सोहळा अमरावती येथील मार्डी रस्त्यावर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मागे उभारण्यात आलेल्या दादासाहेब गवई स्मारक प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, संजय खोडके, सुलभा खोडके, किरण सरनाईक, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

**भव्य स्मारकातील आकर्षणं**

या स्मारकात दादासाहेब गवई यांच्या जीवनकार्याचे दर्शन घडवणारे स्मृतीसभागृह, अत्याधुनिक २०० आसनी श्रोतगृह, स्मरणिका दालन, उपहारगृह आणि दृकश्राव्य कियॉस्कची सुविधा आहे. दर्शनी भागात १५ फूट उंचीचा ब्राँझ धातूचा पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांच्या कार्याचा प्रवास १६ डिजिटल पोस्टर्स आणि दुर्मिळ छायाचित्रांद्वारे दाखवण्यात आला आहे.

**मुख्यमंत्र्यांचे भावनिक शब्द**

कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दादासाहेबांचं स्मारक उभं राहावं, ही सर्वांची इच्छा होती. आज ते सुंदरपणे साकार झालं आहे. मूर्तिकार आणि बांधकाम करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. त्यांनी सांगितले की, या स्मारकात दादासाहेबांच्या निवडक भाषणांचा आस्वाद घेता येईल आणि यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

फडणवीसांनी आपल्या भाषणात दादासाहेबांशी असलेल्या जुन्या आठवणींना उजाळा देत म्हटले, त्या काळी सर्व आमदार रेल्वेने मुंबईला जात आणि सगळे दादासाहेबांच्या जेवणाच्या डब्याची वाट पाहत असत - कारण तो नेहमीच खास असायचा.

मुख्यमंत्र्यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही कौतुक केले. वकीलकीपासून सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदापर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अजिबात बदल झाला नाही, असे त्यांनी नमूद केले.

सोहळ्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र व गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालिका, जिल्हापरिषद निवडणुकांत व्हीव्हीपॅट शक्य नाही, निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत व्हीव्हीपॅटचा वापर करावा अशी मागणी मनसे व महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाकडून राज्य निवडणूक आयोगाला करण्यात आली होती. यावर निवडणूक आयोगाने कायद्याचा हवाला देत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २००५ सालापासून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा (ईव्हीएम) वापर होऊ लागला. मात्र व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत या निवडणुकांशी संबंधित कायदे व नियमांमध्ये कोणतीही तरतूद नाही. काही अपवाद वगळता सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमध्ये प्रत्येक मतदारास सरासरी ३ ते ४ मते देण्याचा अधिकार असतो.

ही बाब लक्षात घेऊन या निवडणुकांकरिता व्हीव्हीपॅट जोडणीची सुविधा असलेले मतदानयंत्र विकसित करण्याबाबत देशभरातील सर्व राज्यांच्या निवडणूक आयोगांची तांत्रिक मूल्यांकन समिती (टीईसी) अभ्यास करीत असल्याचे आयोगाने म्हटले आहे. त्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतरच याबाबत योग्य निर्णय घेतला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आतापर्यंत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात आलेला नाही, असे आयोगाकडून सांगण्यात आले आहे.

# बिहारमध्ये मोठा राडा! प्रचाराला आलेल्या तेजप्रताप यादवांवर दगडफेक


## तेजस्वींच्या समर्थकांनी हुसकावून लावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० पाटणा**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत लालू प्रसाद यादव यांच्या कुटुंबातील अंतर्गत संघर्ष आता रस्त्यावर उतरला आहे. राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख तेजस्वी यादव यांचे मोठे बंधू तेज प्रताप यादव यांना ठगऊच्या संतप्त समर्थकांनी हुसकावून लावल्याची आणि त्यांच्या ताफ्यावर दगडफेक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

तेज प्रताप यादव हे सध्या 'जनशक्ती जनता दल' या त्यांच्या नव्या पक्षाच्या उमेदवारांसाठी प्रचार करत आहेत. महनार विधानसभा मतदारसंघात गगऊ चे उमेदवार जय सिंह राठौर यांच्यासाठी प्रचारसभा संपवून परतत असताना हा प्रकार घडला.





मिळालेल्या माहितीनुसार, तेज प्रताप यादव सभेहून परतत असताना, तिथे उपस्थित असलेल्या जमावाने त्यांच्यासमोर 'लालटेन छाप जिंदाबाद' आणि 'तेजस्वी यादव जिंदाबाद' अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. या घोषणाबाजीनंतर जमाव अधिक आक्रमक झाला आणि त्यांनी तेज प्रताप यांच्या गाडीचा काही अंतरापर्यंत पाठलाग केला, तसेच त्यांच्या ताफ्यावर दगडफेकही केली. यामुळे तेज प्रताप यादव यांना घटनास्थळावरून तातडीने माघार घ्यावी लागली.

**आरजेडी उमेदवारावर कट रचल्याचा आरोप**

या घटनेनंतर गगऊ उमेदवार जय सिंह राठौर यांनी थेट ठगऊ चे स्थानिक उमेदवार रवींद्र सिंह यांच्यावर कट रचून हा हल्ला घडवून आणल्याचा गंभीर आरोप केला आहे. ठगऊच्या गुंडांनी हे कृत्य केले आहे. रवींद्र सिंह यांनी कोट्यवधी रुपयांमध्ये तिकीट विकत घेतले असून, निवडणुकीत तेच अशा धमक्या आणि हल्ले घडवून आणत आहेत, असा आरोप राठौर यांनी केला आहे. बिहार निवडणुकीत दोन्ही भावांमध्ये वाढलेला राजकीय तणाव या घटनेतून पुन्हा एकदा उघड झाला आहे.

# बच्चू कडू रेल्वे रोको आंदोलन करणार नाही; हायकोर्टात दिली ग्वाही

## न्यायालयाने केली बच्चू कडू यांच्या चांगल्या वागणुकीची प्रशंसा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी रेल्वे रोको आंदोलन करण्यात येणार नाही, अशी ग्वाही गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली. न्यायालयाने ही ग्वाही रेकॉर्डवर घेऊन बच्चू कडू यांच्या चांगल्या वागणुकीची प्रशंसा केली. ही वागणूक आदर्श निर्माण करेल, असेही न्यायालय म्हणाले.




शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यासाठी बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या आंदोलनामुळे मंगळवारच्या सकाळपासून वर्धा रोड बंद झाला होता. त्यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला होता. परिणामी, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रजनीश व्यास यांनी बुधवारी या अवैध आंदोलनाची गंभीर दखल घेऊन स्वतःच जनहित याचिका दाखल करून घेतली आणि बच्चू कडू व इतर शेतकरी आंदोलकांना शांततेच्या मार्गाने वर्धा रोड रिकामा करण्याचा आदेश दिला. त्यानंतर कडू व इतर आंदोलक रात्री वर्धा रोडवरून हटल्याने वाहतूक सुरळीत सुरू झाली.

पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांनी गुरुवारी उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचा अहवाल सादर करून वर्धा रोडवरील वाहतूक सुरू झाल्याची माहिती दिली. तसेच बच्चू कडू हे शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास रेल रोको आंदोलन करणार आहेत, याकडेही लक्ष वेधले. दरम्यान, बच्चू कडू यांनी रेल रोको आंदोलन मागे घेतले आहे, अशी माहिती कडू यांच्या वकिलांनी न्यायालयाला दिली.

# विरोधकांचा शनिवारी 'सत्याचा मोर्चा'

## शरद पवार, ठाकरे बंधूंसह सर्वच नेते सहभागी होणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

महाविकास आघाडी व मनसेने मतचोरीच्या मुद्यावर शनिवारी सत्याचा मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चात उद्धव ठाकरे, शरद पवार व राज ठाकरे यांच्यासह काँग्रेसचे सर्वच प्रमुख नेते मंडळी सहभागी होणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चाद्वारे विरोधक मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचे रणशींग फुंकतील असा अंदाज आहे.

काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व मनसेने १ नोव्हेंबर रोजी मतचोरीच्या मुद्यावर सरकारविरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चाची रणनीती आज या तिन्ही पक्षांनी एका बैठकीद्वारे ठरवली. त्यानंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत अनिल परब म्हणाले, विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाचा बेजबाबदार कारभार, मतांमधील घोळ, मतांचा गैरव्यवहार आदी मुद्यांविरोधात १ नोव्हेंबर रोजी सत्याचा मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. लोकांना सत्य कळावे व असत्य जनतेपुढे जावे यासाठी महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्ष व मनसे या मोर्चात सहभागी होतील.

**मोर्चा कुठून कुठपर्यंत जाईल?**


अनिल परब म्हणाले, हा सत्याचा मोर्चा शनिवारी दुपारी १ वा. फॅशन स्ट्रीट येथून सुरू होईल.

# 'वंदे मातरम' सक्तीला अबू आझमींचा विरोध

## मुस्लिमांना वंदे मातरम म्हणण्यास भाग पाडणे चूक; आस्थेचा सन्मान करण्याचा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी राज्यातील शाळांमध्ये करण्यात आलेल्या 'वंदे मातरम'च्या सक्तीला कडाडून विरोध केला आहे. जसे हिंदूंना अल्लाह हू अकबर म्हणण्यास भाग पाडणे चुकीचे, तसे मुस्लिमांना वंदे मातरण म्हणावयास भाग पाडणे चुकीचे आहे, असे ते म्हणालेत. दरम्यान, भाजपने या प्रकरणी अबू आझमींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.



राज्य सरकारने राज्यातील सर्वच मराठी शाळांमध्ये वंदे मातरम गीत म्हणणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी या निर्णयावर आक्षेप घेत हा मुस्लिमांवरील अन्याय असल्याचा आरोप केला आहे. ज्या प्रकारे हिंदू बांधवांना अल्लाह हू अकबर म्हणण्यासाठी भाग पाडणे चुकीचे आहे, तसेच मुस्लिमांना वंदे मातरम म्हणण्यास भाग पाडणेही चुकीचे आहे. प्रत्येक व्यक्तीची स्वतःची एक आस्था असते. आपापला एक धर्म आहे. आपण सर्वांनी त्या आस्थेचा सन्मान केला पाहिजे, असे ते म्हणालेत.

ते म्हणाले, सर्वांच्या आपापल्या आस्था असतात. विशेषतः मुस्लिम धर्मात आईचा सर्वाधिक सन्मान करण्याची परंपरा आहे. आईच्या पायाखाली स्वर्ग आहे असे मानले जाते. पण डोके केवळ अल्लाह पुढेच टेकवले जाते. कारण आमच्या मते, अल्लाह एक आहे. त्यानेच ही पृथ्वी, सूर्य व इतर सर्वकाही निर्माण केले. त्यामुळे आम्ही त्यांनाच नमन करतो. त्यामुळे वंदे मातरम बंधनकारक करणे योग्य नाही.

**भाजप मुस्लिमांना त्रास देण्याचे मुद्दे शोधत राहते**

यावेळी त्यांनी भाजपवरही निशाणा साधला. ते म्हणाले. भाजप मतांसाठी काहीही करू शकते. देशात कोणत्याही प्रकारे द्वेषभावना पसरवण्याचा त्यांचा डाव आहे. वंदे मातरम सारखे मुद्दे समोर आणणे, मुस्लिम मुलींसोबत लग्न करा आम्ही पैसे देतो म्हणणे हे प्रकार केवळ मुस्लिमांना परेशान करण्यासाठी पुढे आणले जात आहेत. असे केल्याने बहुसंख्य समाज आपल्यासोबत येईल असे त्यांना वाटते. कोणतेही काम किंवा विकास न करता हिंदू - मुस्लिम करून भाजप सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. वाघाच्या तोंडाला रक्त लागल्यानंतर तो नेहमीच रक्त शोधतो. त्याचप्रमाणे भाजप रात्रंदिवस मुस्लिमांना दुःखी करून स्वतःला मत शोधण्याचे उपाय शोधत असते.

संपादकीय ......

# नवा आयोग, नवे वेतन!

केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाला अधिकृत मंजुरी देऊन त्याच्या अटी-शर्ती निश्चित केल्या. या बातमीचा देशभरातील सरकारी कर्मचाऱ्यांना आनंद होणे स्वाभाविक आहे. पुढील १८ महिन्यांमध्ये आयोग शिफारसी सादर करणार असून, या आयोगाचा लाभ ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६९ लाख निवृत्ती वेतनधारकांना होणार आहे. यावर्षी जानेवारीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली होती; परंतु त्याची कार्यकक्षा निश्चित करण्यास दहा महिने लागले.

बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्राने वेतन आयोगाच्या मंजुरीची घोषणा केल्यामुळे हा राजकीय लाभ घेण्याचा प्रकार आहे, अशी टीका होईल; परंतु देशात कुठे ना कुठे निवडणुका होतच असतात. शिवाय प्रत्येक आयोगाची एक विशिष्ट मुदत असते आणि त्या वेळापत्रकानुसारच त्या त्या वेळी आयोग स्थापन केला जात असतो. केंद्र आणि राज्य शासन या दोन्ही पातळ्यांवर कर्मचार्यांचे वेतन निश्चित करण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यात आलेली एक प्रशासकीय व्यवस्था अथवा यंत्रणा म्हणजे 'वेतन आयोग'. केंद्रीय वेतन आयोगाचा स्वीकार पुढे विविध राज्य शासनांतर्फेही बहुतांश केला जातो. भारतीय राज्यघटनेत वेतन आयोगासंबंधी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे वा कलमे नाहीत. वेतन आयोग केंद्र शासनाकडे केंद्रीय कर्मचार्यांच्या वेतनवाढीसंबंधीच्या शिफारसी करतो.

शिफारसींचा अभ्यास करून केंद्र शासन वेतनवाढीबद्दलचा निर्णय जाहीर करते. केंद्रात वेतनवाढ लागू होताच वेगवेगळ्या राज्यांतील शासकीय कर्मचारीही पगारवाढीच्या मागणीसाठी अनेकदा रस्त्यावर उतरतात. अशावेळी केंद्राकडून राज्य कर्मचार्यांना सुधारित वेतन आयोगानुसार करण्यात आलेल्या शिफारसी लागू करण्याबाबत राज्यांना सुचवले जाते. आता आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनंतर केंद्रीय कर्मचार्यांच्या मूळ वेतनात वाढ केली जाईल आणि त्याचा लाभ लाखो केंद्रीय कर्मचारी व निवृत्ती वेतनधारकांना होईल, असे केंद्रीय महिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे. वेतन आयोग म्हणजे केवळ वेतनरचना नव्हे, तर भत्ते, निवृत्ती वेतन आणि महागाई भत्ता यांचाही आढावा वेतन आयोग घेत असतो. दर दहा वर्षांनी केंद्रीय कर्मचार्यांच्या वेतनाची पुनर्रचना करण्यासाठी नवा आयोग स्थापन केला जातो. २०१६ मध्ये लागू झालेल्या सातव्या वेतन आयोगानंतर गेली काही वर्षे केंद्रीय कर्मचारी वेतनवाढीची मागणी करत होते. सततची भाववाढ त्याचप्रमाणे मुलांच्या शिक्षणावरील तसेच वाहतुकीवरचा खर्च वाढलेला आहे. दैनंदिन खर्चातच एकूण वाढ झाली आहे. आगामी काळात आठवा वेतन आयोग १४ ते १८ टक्के किंवा ३० ते ३४ टक्के वेतनवाढ सुचवेल, असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे.

मध्यम स्तरांवरील पदावर असलेल्या कर्मचार्यांना किमान १५ हजार ते १९ हजार रुपये प्रतिमहिना वेतनवृद्धी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अर्थात, आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी १ जानेवारी २०२६ पासूनच होऊ शकते. वेतन सुधारण्यासाठी वापरण्यात येणारा 'फिटमेंट फॅक्टर' किती असेल, यावर वेतनात होणारी वाढ अवलंबून असते. हा फॅक्टर १.८३ राहिला, तर प्रभावी वेतनात (इफेक्टिव्ह सॅलरी) १४ टक्के वाढ होऊ शकते. हा फॅक्टर २.१५ असल्यास वेतनात ३४ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. 'फिटमेंट फॅक्टर' २.४६ असावा, अशी शिफारस झाल्यास वेतनात तब्बल ५४ टक्क्यांची वाढ होऊ शकते, असा अंदाज आहे.

## आमचे आदर्श आणि प्रेरणादायी व्यक्तीमत्व

# प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील

व्यक्तीचे यश वाढले की परिचयाचे परिघ वाढत जाते आणि परीचयाचे परिघ वाढत गेले की व्यक्तीची ओळख करून देण्याची आवश्यकता उरत नाही कारण तोपर्यंत व्यक्ती कुणालाही अनोळखी असेल ही बाब शिल्लक उरत नाही.असे एक नामवंत व्यक्ती, जे स्वतः मध्ये एक विचारधारा आहे, ज्यांच्या विचारांवर आधारित आजचे हे शब्द आहे असे व्यक्तिमत्व म्हणजे सध्या एस पी कॉलेज येथे कार्यरत प्राचार्य आदरणीय डॉ. अविनाश मोहरील सर.विद्यर्थ्यांच्या आयुष्यात अद्भुत आत्मविश्वास निर्माण करून त्यांच्यामध्ये यशाची परिभाषा रूजवणारे आमचे प्राचार्य. असंख्य व्यक्तींच्या मनावर राज्य करून , विपरीत परिस्थितीतही सर्व गोष्टी सांभाळणारे,नाना प्रकारे आम्हाला नवीन गोष्टींसाठी, कार्यासाठी प्रेरणा देणारे,शक्ती, सामर्थ्य, विनम्रता, प्रेम सर्व गुण जोपासून , विद्यार्थ्यांप्रती मोह , विद्यार्थ्यांच्या विकासाची कास कायम धरून ठेवणारे,हळव्या मनाचे आमचे पालक शिक्षक असणारे,रीतसर प्रत्येक गोष्टीचा आढावा घेत, चूकलेली गोष्ट दुरूस्त करून, लक्ष्य, ध्येय सर्व महाविद्यालयाच्या विकासासाठी, विद्यार्थीनींसाठी साध्य करणारे , आमचे सर्वस्व मार्गदर्शक असे व्यक्तिमत्व. आपल्या बद्दल काही तरी लिहणे हे खरंच माझ्या साठी अतिशय कठीण काम आहे, तरीही मी प्रयत्न करते , की आपण ओंजळीत दिलेल्या शब्दांचा साठा करून, थोडं का होईना पण बोलावं आपल्याविषयी. कारण एक विद्यार्थी सर्व काही विसरू शकतो पण ज्या व्यक्तीने जगण्याची खरी परिभाषा शिकवली अश्या व्यक्तीला विसरणे शक्य नाही .करूणा आणि ममता, मार्गदर्शन आणि पाठिंबा या चारही सुत्रांचे खरे स्तंभ आपण आहात.

सर, आपलं संपूर्ण आयुष्य आमच्या साठी प्रेरणादायी आहे .ठजइएठढ ऋछजडढ यांची कविता जी आपण पहिल्यांदा आमगाव येथील विद्यार्थ्यांना शिकविली होती, त्या कवीतेतील हे शब्दढु ৗरवी वळ-ৗशिसशव ळप र्ुव, रपव ख-ख ৗझ ৗहश पश श्रशीी ৗरीशश्रशव लू,-पव ৗहरीं हरी रवश रश्रश्र ৗहश वळष-षशीशपलश.

त्यावेळीचे आपण आम्हाला सांगितलेले अनुभव. १९९६ ला आपण सुरू केलेला हा प्रवास जो अजूनही सुरू आहे. जो प्रवास आजवर अदृश्य उंचीवर पोहचलेला आहे. खरंतर आयुष्यात जगणे हाच एक प्रवास आहे आणि या प्रवासात विद्यार्थ्यांना जर आपल्या सारखे मार्गदर्शक लाभले तर हा प्रवास कितीही कठीण असो , अनुभवाच्या वाटेवर हा प्रवास सोपा होत जातो. मात्र या प्रवासादरम्यान आवश्यकता असते जीव ओवाळणाऱ्या मार्गदर्शनाची, असे मार्गदर्शक जे आपल्याला रागवतील, बोलतील, वेळ आल्यावर शिक्षा देखील करतील मात्र सर्वस्व विद्यार्थ्यांवर अर्पण करतील. असे मार्गदर्शन ज्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात असतील ते विद्यार्थी जरी एखाद्या परीक्षेच्या परिणामात नापास होतीलही मात्र आयुष्याच्या निकालात असे विद्यार्थी कधीच नापास होत नाही. असे एक व्यक्तिमत्व म्हणजे अविनाश मोहरील सर, विद्यार्थ्यासाठी सर्वस्व अर्पण करणारे दिशे-दिशेवर पावले उघडे करून देणारे एक व्यक्ती. फक्त एक साधी व्यक्ती नसून आमच्या डोळ्यासमोरील चालती बोलती सकारात्मकता आहे. बहुतेक वेळा आभास आणि परिकल्पना एवढी दूरच्या प्रवास गाठते ती सरांचे वर्तमानपत्रातील लेख वाचत असताना असा आभास होतो की प्रत्यक्ष सर आपल्यासमोर वक्तव्य करीत आहे.सर कायम आम्हाला मार्गदर्शन करीत असताना, आमच्यासमोर वक्तव्य करत असताना एक गोष्ट सांगतात, ही मुलीला आयुष्यात किमान एक नोट, मग ती १०० ची असो की ५०० ची ती फाडता आली पाहिजे, एका नोटीचे दोन तुकडे तिला करता यायला हवे आणि जेव्हा कोणी तिच्या हक्क गाजवीत तिला विचारेल , की नोट का फाडली तर त्यावर तिचे उत्तर असायला हवे की माझी होती ,माझ्या हक्काची, माझ्या कमाईची होती म्हणून मी फाडली.अर्थातच त्यांच्या वक्तव्यातून दिसून पडते एका मुलीचे स्वतःच्या आयुष्यात सक्षम असणे किती गरजेचे आहे, तिचं अवलंबित आयुष्यभरासाठी वडील, नवरा किंवा मुलांवर अवलंबून नसून ती स्वतः स्वतःच्या आत्मस्वातंत्र साठी सक्षम असायला हवी.मुलगी स्वतः च्या पायावर उभी असावी जेणेकरून तिला दहा- विस रूपयासाठी देखील कुणासमोर हात पसरवण्याची वेळ उभ्या जन्मभर येऊ नये.सरांच्या या गोष्टीला आम्हाला सदैव प्रेरित केले आहे.मला सरांची ही गोष्ट वैयक्तिक रित्या अतिशय आवडते आणि फक्त मलाच नाही तर महिला महाविद्यालयात असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची ही गोष्ट आवडीची आहे.



असं म्हणतात मानवी जीवन जगत असताना आपल्या आयुष्यात एक तरी आदर्श व्यक्ती असायला हवी .

ज्या आदर्श व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाने कायम आपल्याला योग्य मार्ग दिसावे आणि जगण्यातील लहान मोठ्या सर्व समस्यावर आघात करता यावा, विजय मिळवता यावा आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील असे एक व्यक्तिमत्त्व म्हणजे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील सर. आपले सदर , ' थोडा है थोडे की जरूरत है ' यामधील प्रत्येक घटना वर्णन हे मनाला भावनारे आहे, त्यापैकी ज्या गोष्टी आपण महाविद्यालयात आम्हाला सांगितल्या त्याचे पडसाद अजूनही आमच्या मनावर उमटलेले आहे.अमरावती वरून सुरू झालेले हे ' थोडा है, थोडे की जरुरत है ' तसेच ' सुखात्म' सदर अजूनही निरंतर सुरू आहे या गोष्टीचा आम्हा सर्वांना अतिशय आनंद आहे.या वृत्तपत्रांतील लेखाद्वारे आम्हाला अजूनही आपण आमच्या जवळ असण्याची जाणिव करुन देते.माझ्या आयुष्यातील आपण असे एक व्यक्तिमत्व आहात ज्यांच्या समोर कुठल्याही कार्यासाठी, बाबींसाठी आपणं आपल्या मनात नकार धरून बसणे अशक्य आहे, कारण सरांच्या वक्तृत्वाची क्षमता एवढी विशाल आहे की मतपरिवर्तनाची धारा जशी सरांच्या कंठात विराजमान आहे.सर आपले कार्य कर्तृत्व आणि संपूर्ण आयुष्य आमच्या साठी प्रेरणादायी आहे.

सन्मान हा दोन प्रकारे दिला जातो असे मला वाटते..एक तर सन्मान व्यक्तीला दिला जातो आणि दुसरा प्रकार म्हणजे सन्मान या शब्दाला शोभेल असे व्यक्तिमत्व देणे. सन्मान या परिभाषेच्या वलयात राहणारे आपण व्यक्ती आहात.सर आपल्या सारखे सर्वोत्कृष्ट प्राचार्य खरंच सर्व विद्यार्थ्यांना लाभत नाही, तरी आम्हाला लाभले हे आमचे सौभाग्यच.

आज पुन्हा आपल्या वाढदिवसाच्या अनुषंगाने लिहता आले.आणखी काहीतरी उत्कृष्ट अश्या शब्दांत वर्णन करण्याचे प्रयत्न केले.आपणास या जगातील सर्व प्रकारचे आनंद लाभो.वैभव, किर्ती, समृद्ध सर्व आपल्या उंबरठ्यावर कायम विराजमान राहो.आपली साथ, आपला आशीर्वाद, प्रेरणा सदैव आम्हा विद्यार्थीनींसोबत राहो. याच अनुषंगाने आमचे आवडते, आमचे आदरणीय, सन्माननीय महिला महाविद्यालय, अमरावती येथील पूर्व प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील सर( सध्या एस पी कॉलेज ऑफ पुणे चे प्राचार्य) सर , आपणास वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा सर.आपले सहकार्य सदैव आमच्या पाठीशी असावे सर एवढीच अपेक्षा सदिच्छा व अनंत शुभेच्छा !

**कु.प्रिती रविन्द्र पांडे**
प्राध्यापक, केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.
माजी विद्यार्थी- महिला महाविद्यालय अमरावती.

# तेथे कर माझे जुळती : कर्तव्याचे महामेरू : दादासाहेब गवई

फोटो घेणेदीक्षाभूमी स्मारकाचे शिल्पकार आमची चेतना, आमची प्रेरणा, स्मृतीशेषदादासाहेब उपाख्य रा. सु. गवई साहेब यांनी तत्कालीन दलित आणि आजच्या आंबेडकरी चळवळीला महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहेच. खंबीरपणे बिहार, सिक्कीम आणि केरळ या राज्यांच्या अत्यंत महत्त्वाच्या संविधानिक पदाची राज्यपाल म्हणून धुरा सांभाळली आहे. एवढेच नव्हे तर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे समस्त जनतेच्या हृदयस्थ वसणारे आदरणीय व्यक्तिमत्व म्हणजे दादासाहेब गवई. यांची आज जयंती.

दादासाहेबांचा जन्म महाराष्ट्र राज्याच्या अमरावती जिल्ह्यातील दारापूर या गावी ३० ऑक्टोबर १९२९ ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्यभानजी तर आईचे नाव सरूबाई होते. दादासाहेबांचे शिक्षण पदवी पर्यंत झाले होते. तत्कालीन परीस्थिती जातीयता, अन्याय, दारिद्र्य यानी ग्रासलेली होती. या परिस्थितीशी सामना करत शालेय आणि महाविद्यालयीन जीवनातच दादासाहेबांना समाजकार्याची ओढ लागली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संघर्षमय जीवन, त्यांचे कार्य दादासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी प्रेरक ठरले. दादासाहेबांचे प्रारंभीचे जीवन फार कष्टमय होते. पण त्या कठीण काळात सुद्धा आमच्या आदरणीय कमल आईनी त्यांना कसोशीने साथ दिली. समाजहिताचा विचार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. दादासाहेब गायकवाड यांच्या नंतर रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाची धुरा दादासाहेबांवर आली. त्यांनी सभा घेऊन, अन्यायाविरुद्ध मोर्चे काढून, गावोगाव पालथे घालत सर्वदूर पर्यंत पक्षाची बांधणी केली. राजबिंड रूप असलेले दादासाहेब हे लोकप्रिय नेते होते. मृदभाषी असलेले दादासाहेब नेहमीच समाजाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांच्या कौटुंबिक कार्यक्रमात सहभाग घेत असत.

कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांनी आपले कार्य अविरतपणे सुरूच ठेवले. राजकीय आणि सामाजिक कार्यामध्ये त्यांचे योगदान अजातशत्रू होते.विधान परिषदेचे सभापती व नेते मा. दादासाहेब गवई हे रोजगार हमी योजनेचे निर्माते आहेत हे बहुतेकांना माहीतही नसेल काम करावे पण त्याचा उहापोह करून श्रेय लाटण्याचा स्वभाव त्यांचा नव्हताच मुळी. आणीबाणीच्या काळात दादासाहेबांनी दिल्ली येथे आरक्षण समर्थनार्थ पुस्तिकेचे प्रकाशन केले. मराठवाडा विद्यापीठ नामांतर, रिडल्स प्रकरण, घाटकोपर पुतळा विटंबना, गवई बंधूंचे डोळे फोडणे प्रकरण आदी इतरही अनेक सामाजिक आंदोलनाचे त्यांनी सक्षम नेतृत्व केले. मा. दादासाहेब गवई जेव्हा बिहारला राज्यपाल म्हणून नियुक्त झाले तेव्हा बिहार राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अभूतपूर्व अशा सुधारणा केल्यात. केरळ चे राज्यपाल असताना त्यांचा कम्युनिस्टांशी संघर्ष झाला होता. राजकीय पदावर असूनही ते अत्यंत साधे आणि कार्यकर्त्यांना सहज उपलब्ध असत. त्यांनी आंबेडकरवादाचा वारसा काशोशीने पुढे नेला आणि सामाजिक न्यायासाठी शेवटच्या क्षणापर्यंत झटले. म्हणूनच ते आंबेडकर वादाचे पुरस्कर्ते ठरले. अशी एक ना अनेक



महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली. सदस्य विधान परिषद, महाराष्ट्र राज्य (१९६४-६८,१९८२- ८५) उपसभापती विधान परिषद, महाराष्ट्र राज्य (१९९०-९४,१९६८-७८) उपाध्यक्ष कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन (महाराष्ट्र शाखा). विरोधी पक्षनेता विधान परिषद महाराष्ट्र राज्य (१२ डिसेंबर १९८६-१९८८). संसद सदस्य, लोकसभा (१९९८-९९) संसद सदस्य, राज्यसभा (एप्रिल २०००) झालेत. यासोबतच ते सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही विविध पारितोषिके व पुरस्काराचे सुद्धा मानकरी ठरले. साहित्यिक, कलात्मक व वैज्ञानिक क्षेत्रात त्यांनी कृष्टरोगी लोकांना विशेष मदत आणि सुखसुविध उपलब्ध करून दिल्यात, तसेच विशेष अभिरुचीक सवलतीसाठी प्रयत्नशील असल्याबद्दल त्यांना कुष्ठ मित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक सेवा आणि अस्पृश्यता व कुष्ठरोग निर्मूलन प्रयत्नांबाबत केलेल्या कार्यासाठी त्यांना प्रियदर्शनी समूह मुंबई १९९०-९१ सालीचा प्रियदर्शनी पुरस्कार प्राप्त झाला. विविध क्षेत्रातील सामाजिक कार्याबद्दल १९९४ ला भारत सारथी सन्मान नॅशनल प्रेस ऑफ इंडिया कडून प्रदान करण्यात आला. जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याकरिता १९९७ ला अब्दुल कलाम आझाद पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजसेवा आणि नागपूर व नवी दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दीक्षाभूमीच्या तसेच विकासाकरिता विशेष सातत्याने पाठपुरावा व प्रयत्नांबाबत १९९९ ला ईश्वरी देवी पुरस्कार व मारवाडी फाउंडेशन पुरस्कार -२०१२ ने सन्मानित करण्यात आले. अशी मोठी यादीच त्यांच्या कार्याची, पदांची आणि संमान्नांची आहे विस्तारभयास्तव ते येथे टाळणेच योग्य होईल.

नागपूर दीक्षाभूमी हे ऐतिहासिक स्मारक व्हावे यासाठी दादासाहेबांनीच खंबीरपणे पुढाकार घेतला. दीक्षाभूमी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काशाय भारताच्या स्वप्नांची भूमी, मानवतेचे फडकलेले निळे निशान, अशोकाच्या धम्मचक्राचा केंद्रबिंदू, मनामनात अस्मिता पेरणाऱ्या बोधींकुराची सुपीक जमीन, वंचितांची आई, समतेचा वारा, करुनीचा कळस आणि बौद्ध संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची साक्षांकित मुद्रा...! कितीही लिहिले तरी 'दीक्षाभूमी' साठी प्रतिमा, प्रतीके, उपमा, मिथके कमीच पडतात. अशा दीक्षाभूमीने आपल्या उदरातून एका विज्ञाननिष्ठ मानवतावादी समतामुलक संस्कृतीला जन्म दिला आहे. ही संस्कृती म्हणजे आंबेडकरी बौद्ध संस्कृती होय. या संस्कृतीने माणसाला माणूसपणाची जाणीव करून दिली. जगण्याला बळ दिले, मेंदूला खाद्य आणि अज्ञान, अंधाकाराला मूठ माती दिली. दीक्षाभूमी नुसतेच स्मारक नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जगाच्या पुनर्निर्मितीचा सिम्बॉल आहे. या दीक्षाभूमीने जगाला मानव मुक्तीच्या मानवी हक्कांचा जाहीरनामा दिला आहे. या प्रेरणाभूमीचे शिल्पकार रा. सु. उपाख्य दादासाहेब गवई हे आहेत ही काळ्यादगडावरची अमीट छाप कुणीही पुसू शकणार नाही. दादासाहेबांच्या नेतृत्व, कर्तुत्व, वकृत्व, संघटन कौशल्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील असीम श्रद्धेतूनच दीक्षाभूमी स्मारक पूर्णत्वास गेले हे वास्तव आहेच.

**प्रा. दीपाली गवई**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती
Mob. ७३०४८०७४०५



मा. दादासाहेबांचे अमरावती येथील जुने घर फ्रेजरपुरा येथे होते. कमलताईंनी हप्तेवारीने शिलाई मशीन आणून कपडे शिवून प्रपंच चालविला. संसारात एवढ्या खस्ता खाऊन सुद्धा त्यांनी समाजकार्य सुरूच ठेवले. दादासाहेब गवई यांचे जीवन हे अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये जिथे स्वार्थ वाढला आहे तीथे दादासाहेबांनी केलेली समाजाची निस्वार्थ सेवा हा खरा आदर्श नव्या पिढीला खऱ्या अर्थाने दिशा देणारा आहे. प्रतिकूल परिस्थिती असून सुद्धा दृढनिश्चय आणि सेवाभावनेने कार्य केले तर समाजाचा चेहरा बदलू शकतो हे ते सिद्ध करून गेलेत. दादासाहेब गवई हे समाजसेवा, शिक्षणव्रत, आणि मानवतेच्या आदर्शाचे मूर्तीमंत प्रतीक होते. शिक्षणातून परिवर्तन, सहकारातून समृद्धी हाच दादासाहेबांचा जीवनमंत्र आजही प्रेरणादायी आहे. दादासाहेब गवई हे केवळ व्यक्ती नव्हते, तर एक विचार, एक प्रेरणा आणि समाजसेवेचा अखंड दीपस्तंभ होते.

दादासाहेब गवई हे एक दूरदृष्टी असलेले नेते होते. ज्यांनी आपले जीवन सामाजिक समता आणि न्यायासाठी समर्पित केले. ते दृष्टे होते. त्यांचे नेतृत्व सर्व समाजाने मान्य केले यात तीळमात्र शंका नाही. दादासाहेबांचे दुःखद निधन दि.२५ जुलै २०२५ आजाराने झाले. त्यांचे भव्य स्मारक अमरावतीमधील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांमध्ये आज दि.३०/१०/२५ रोजी साकारण्यात येत आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला क्रांतिकारी जयभीम..!

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण आपल्या मेंदूची कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्नशील असतो. बाजारात 'नूट्रॉपिक सप्लिमेंट्स' किंवा 'ब्रेन रेव्ह' सारख्या नवीन संकल्पना येत असल्या तरी, मेंदूची शक्ती वाढवण्यासाठी काही अत्यंत सोपे आणि मूलभूत उपाय आहेत, जे तुम्ही रोजच्या जीवनात सहज करू शकता.डॉक्टर आणि पोषणतज्ज्ञांच्या मते, मेंदूला तंदुरुस्त ठेवण्यासाठी 'या' ८




## मेंदूची क्षमता वाढवण्यासाठी ८ सोपे आणि प्रभावी उपाय! तणाव विसरा, फोकस वाढवा

साध्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे

१. तुमच्या डोक्याचे संरक्षण करा

हे जितके सोपे वाटते, तितकेच महत्त्वाचे आहे. क्लिनिक चालवणाऱ्या डॉ. सबाईन डोन्नई यांच्या मते, डोक्याला होणाऱ्या लहानशा इजा देखील रक्त-मेंदू अडथळ्यावर परिणाम करू शकतात. हा संरक्षक थर



हानिकारक विषारी पदार्थ मेंदूत जाण्यापासून थांबवतो. एकदा हा थर कमजोर झाल्यास, विषारी घटक मेंदूत प्रवेश करतात आणि 'ब्रेन फॉग' किंवा दीर्घकाळ स्मृतीभ्रंश होऊ शकतो. त्यामुळे सायकल चालवताना हेल्मेट घालणे अनिवार्य आहे.

२. हृदयाचे आरोग्य जपा

ऑक्सफर्ड विद्यापीठातील न्यूरोलॉजीचे प्राध्यापक मसूद हुसेन यांच्या मते, उच्च रक्तदाब तुमच्या मेंदूच्या आरोग्यावर मोठा परिणाम करतो.

नियमित तपासणी: रक्तदाब, बीएमआय, रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉल यांची नियमित तपासणी करा. रक्तदाब सातत्याने १३५/८५पेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न करा.

व्यायाम: आठवड्यातून किमान अडीच तास मध्यम तीव्रतेचा व्यायाम (उदा. धावणे, सायकलिंग, जलद चालणे) करा.

३. रंगीबेरंगी आहार घ्या

पोट आणि मेंदूचा संबंध आता सिद्ध झाला आहे. पोषणतज्ज्ञ ओल्गा डोनिका सांगतात की, आतड्यातील सूक्ष्मजंतू असे घटक तयार करतात जे तुमच्या स्मरणशक्ती आणि मनःस्थितीवर परिणाम करतात.

आहारात विविधता: दही किंवा किमची सारखे आंबवलेले पदार्थ खा. दररोज अनेक रंगांच्या फळे आणि भाज्यांचा समावेश करा.

मसाले आणि स्निग्ध पदार्थ: हळद, आले, लसूण, दालचिनी यांसारखे मसाले आणि सॅल्मन, एवोकॅडो, ऑलिव्ह तेल यांसारखे आरोग्यदायी स्निग्ध पदार्थ खा. रिफाइंड साखर आणि अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थ टाळा.

४. शांतता स्वीकारा

डॉ. डोनिका यांच्या मते, मेंदूला उत्तेजना आणि आराम दोन्हीची गरज असते.

ध्यान (चशवळींरींळेप): दिवसातून दोनदा केवळ पाच मिनिटे ध्यान केल्यास तणाव कमी करणारा हार्मोन कॉर्टिसोल नियंत्रणात राहतो.

५. नवीन कौशल्ये शिका (ङशरीप र छशु डज्ञळश्रश्र)

ड्यूक युनिव्हर्सिटीतील मानसोपचार तज्ज्ञ मुरली दोरैस्वामी यांच्या मते, मेंदूला तीक्ष्ण ठेवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मानसिकदृष्ट्या आव्हान देणारी कामे करणे.

तुम्ही जर सुडोकूमध्ये हुशार असाल, तर टँगो सारखी शारीरिक गोष्ट शिका.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. ३० ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण


# महामार्गांवर कळणार आता ठेकेदाराचे नाव अन् पत्ताही

## क्यूआर कोडवर अधिकाऱ्याचा मोबाईल नंबरही देणार - गडकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० नागपूर** – आता कोणताही महामार्ग बांधणार्या ठेकेदारावर महामार्ग मंत्रालयाचा प्रभावी अंकुश असणार असून, संबंधित महामार्गावर ठेकेदाराचे नाव आणि पत्ता लिहिलेला असेल. सोबतच, संबंधित अधिकार्याचा मोबाईल नंबरही त्यात समाविष्ट असेल, अशी माहिती केंद्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे.




भारतीय उद्योग महासंघाच्या कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले, ही सर्व माहिती क्यूआर कोडच्या स्वरूपात असेल. मोबाईलद्वारे हा कोड स्कॅन केल्यानंतर त्यात सगळा तपशील सामान्य नागरिकांना उपलब्ध होईल. यामुळे ठेकेदारांना उच्च दर्जाचे बांधकाम करावे लागेल आणि रस्त्यांचा दर्जाही वर्षानुवर्षे टिकून राहण्यास मदत होईल. ठेकेदार आणि अधिकारी यांचे साटेलोटे मोडून काढण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यामुळे ठेकेदार आणि अधिकार्यांवर एकप्रकारचे नैतिक दडपणही निर्माण होईल.


**दोषींवर होणार कडक कारवाई : गडकरी**

सध्या महामार्ग मंत्रालयाने देशातील विविध रस्ते योजनांचा आढावा घेण्याचे काम सुरू केले आहे. त्यात दोषी आढळणार्यांविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. तसेच, महामार्ग मंत्रालयाच्या महसुलाची रक्कम ५५ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. येत्या दोन वर्षांत ही रक्कम १.४ लाख कोटींवर नेण्याचा संकल्प आम्ही सोडला आहे. देशातील रस्ते जागतिक दर्जाचे असले पाहिजेत, यात वादच नाही. मात्र, त्यापेक्षाही या रस्त्यांचा दर्जा सांभाळणे आणि त्यांची नियमित देखभाल करणे या गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत, असे गडकरी यांनी नमूद केले.

### जनतेसाठी 'एनएचएआय'कडे तक्रारीची सुविधा

महामार्गांवर अनेकदा आपत्कालीन परिस्थिती ओढवते. अशावेळी प्रवाशांना तातडीने मदत मिळणे गरजेचे असते. त्यामुळे प्रवाशांच्या मदतीसाठीदेखील क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याद्वारे प्रवाशांना सर्वप्रकारची मदत तातडीने मिळणार आहे. या माध्यमातून प्रवासी आपली तक्रार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) किंवा अन्य संबंधित प्राधिकरणाकडे नोंदवू शकतील आणि त्यामुळे अधिकार्यांना संबंधित प्रवाशांपर्यंत पोहोचणे सुलभ होईल, असेही गडकरी यांनी स्पष्ट केले.

# '३.. ५.. २१.. रुपयांची मदत' बळीराजाची क्रूर थट्टा




## शेतकऱ्याने प्रशासनाला परत केला २१.८५ चा चेक!

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३० अकोला**

राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई दिवाळीपूर्वी देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. मात्र, प्रत्यक्षात प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली रक्कम पाहून संपूर्ण राज्यातील शेतकरी संतप्त झाले आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात केवळ ३ रुपये, ५ रुपये आणि कमाल २१ रुपये ८५ पैसे इतकी अत्यल्प रक्कम जमा झाली आहे.

मोठ्या नुकसानीच्या तुलनेत मिळालेल्या या नगण्य रकमेला शेतकऱ्यांनी 'आर्थिक थट्टा' असे संबोधले आहे.२१ रुपयांत एक किलो साखर सुद्धा येत नाही, ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे, अशी संतप्त भावना एका शेतकऱ्याने व्यक्त केली. या अत्यल्प रकमेमुळे नुकसानभरपाईचा कोणताही दिलासा मिळणार नाही, असा शेतकऱ्यांचा सवाल आहे.या 'थट्टा' करणाऱ्या मदतीचा निषेध म्हणून अकोल्यातील शेतकऱ्यांनी एक आगळेवेगळे प्रतीकात्मक आंदोलन केले. ज्या शेतकऱ्याच्या खात्यात २१ रुपये ८५ पैसे जमा झाले, त्या शेतकऱ्याने '२१ रुपये ८५ पैसे' इतका रकमेचा चेक लिहून तो जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबंधित विमा कंपनी आणि विभागाला परत पाठवला आहे.शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले असताना, शासनाकडून अशा प्रकारची तुटपुंजी भरपाई मिळणे अत्यंत लाजिरवाणे आहे. यामुळे शासनाने जाहीर केलेल्या भरपाई पॅकेजवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.शेतकऱ्यांनी या अल्परकमेचा तीव्र निषेध करत शासनाकडे तातडीने न्याय्य आणि भरीव नुकसान भरपाई जाहीर करण्याची व ती त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी केली आहे.

# शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी काँग्रेसची अमरावतीत पूर्वतयारी बैठक



## प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष एम एम शेख यांनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती,**

निवडणूक आयोगाकडून शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची तयारी सुरू झाली असून, एक नोव्हेंबर पासून नव्याने मतदार नोंदणीची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे. याकरिता सर्वच राजकीय पक्ष सक्रिय झाले असून, काँग्रेस पक्षाने देखील या निवडणुकीत कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या चाचणीसह मतदार नोंदणीसाठी आज, गुरुवारी काँग्रेस भवन येथे अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण) तर्फे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी बैठक पार पडली.या बैठकीस म. म. शेख, वरिष्ठ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच वसंतराव पुरके, खासदार बळवंतराव वानखेडे,यशोमती ठाकूर,माजी आमदार विरेंद्र जगताप, व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, सुनील देशमुख, बबलुभाऊ शेखावत,मिलिंद चिमोटे,विलास इंगोले,अशोक अमानकर, प्रफुल मानकर यांनी मार्गदर्शन केले.यावेळी हरिभाऊ मोहोड, सुधाकरराव भारसाकळे,दयारामजी काळे, प्रकाशराव काळबांडे, बाळासाहेब हिंगणीकर, मुकद्दर खा पठाण, व्यासपीठावर उपस्थित होते.बैठकीत शिक्षक मतदारसंघातील काँग्रेस पक्षाची संघटनात्मक तयारी, कार्यकर्त्यांची जबाबदारी, मतदार नोंदणी मोहिमेची आखणी आणि आगामी निवडणुकीसाठी ठोस रणनीती या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीला प्रदीप देशमुख (सेवादल) प्रमोदराव दाळू, भैय्यासाहेब मेटकर, जयश्रीताई वानखडे, सतीशराव हाडोळे, श्रीकांत झोडपे, सेतू देशमुख, अजीज खान, राजाभाऊ टवलारकर, विनोद पवार, नामदेवराव तनपुरे, विनोद भालेराव, राजेशभाऊ काळे, नंदू यादव, वीरेंद्रसिंह जाधव,अमित गावंडे, अरविंद लंगोटे,समाधान दहातोंडे,रमेश सावळे,आतिश शिरभाते, किशोर देशमुख किशोर कीटुकले, प्रदीप देशमुख,अरविंद पखान, निखिलराव कोकाटे, वैभव वानखडे, साहेबराव भदे, ईश्वर बुंदिले, दीपक सवई,महेंद्रसिंग गेलवार, श्याम बेलसरे, सहदेव बेलकर, राजेश शेमलकर, भूषण कोकाटे पंकज विधळे, कलीम भाई, सलामउद्दीन शेख, अमोल देशमुख, नितेश वानखडे,सागर देशमुख, गजानन देशमुख, निशु जाधव,समीर पाटील, हिरालाल काशीकर व जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिक्षक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोंथा चक्रीवादळामुळे महाराष्ट्रावर अवकाळीचे सावट

## अजून किती दिवस जोरदार पावसाचा अंदाज

## अमरावतीत पहाटे पासूनच मुसळधार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०मुंबई**

अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील हवामान बदलामुळे विदर्भासोबतच कोकण किनारपट्टीला देण्यात आलेले पावसाचे इशारे कायम असून, अरबी समुद्रातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे शुक्रवारी कोकणकिनारी मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

वाऱ्याचा वेग आणि खवळलेल्या समुद्राच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण कोकण किनारपट्टीला दक्षतेचा इशारा देण्यात आला असून, मुंबईसह लगतच्या किनारपट्टीवरील मच्छीमारांनी बोटी धक्क्याला लावल्या आहेत.या दोन प्रणालींच्या एकत्रित परिणामामुळे ५ नोव्हेंबरपर्यंत राज्यभर ढगाळ वातावरण राहून हलका ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले मोंथा चक्रीवादळ मंगळवारी रात्रीच एक वाजता आंध्रप्रदेशच्या किनारी धडकले. आता त्याचे रूपांतर तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात झाले. त्याचा प्रवास मध्य प्रदेशच्या दिशेने सुरू असून, गुरुवारी हे क्षेत्र विदर्भालगत असेल.




शुक्रवारी त्याचा प्रवास मध्य प्रदेशच्या दिशेने सुरू राहील आणि त्याच दिवशी हे क्षेत्र युपी, बिहारच्या दिशेने सरकत सिक्कीमकडे वाटचाल करील. तर अरबी समुद्रात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाचे क्षेत्र धिम्या गतीने पुढे सरकत आहे.

**कशामुळे अवकाळी**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या मोंथा चक्रीवादळामुळे महाराष्ट्रात अवकाळीचे संकट.

अरबी समुद्रातील कमी दाबाचा पट्टा ओमानकडे जाण्याऐवजी महाराष्ट्र आणि गुजरातच्या किनारपट्ट्यांच्या आसपास रेंगाळला.

**अमरावतीत पहाटे पासूनच मुसळधार–** अमरावती शहरात पहाटे चार वाजल्यापासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली सकाळी ९ पर्यत पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या त्यामुळे शहरातील सकल भागात पावसाचे पाणी जमा झाले होते.

# तडीपार आरोपीकडून गावठी कट्टा, जिवंत काडतुसे आणि वाहन जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती :** पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैधरित्या अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याच्या निर्देशानुसार अमरावती शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. तडीपार आरोपी शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम (वय २४, रा. पठाण चौक, अमरावती) याच्याकडून एक गावठी बनावटी देशी कट्टा, दोन जिवंत काडतुसे व ॲक्सेस मोपेड (क्र. चक २७ ऊत ७३०२) असा एकूण १,१९,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पथक दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. आरोपी ॲकेडमी हायस्कूल मैदानावर गुन्हा करण्याच्या उद्देशाने शस्त्रासह उभा असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ छापा टाकून आरोपीस ताब्यात घेतले.



**जप्त मुद्देमालात** -१) देशी बनावटीचा लोखंडी कट्टा (मॅगझीनसह) किंमत ३५,०००/- २) दोन जिवंत काडतुसे किंमत ४,०००/-३) ॲक्सेस दुचाकी (चक २७ ऊत ७३०२) किंमत ८०,०००/-असा एकूण १,१९,०००/- किंमतीचा माल समाविष्ट आहे.

आरोपी शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम याच्यावर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असून त्यात चोरी, मारहाण तसेच खुनाचे गुन्हे समाविष्ट आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि अमोल कडू, पोहया दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, सुनील लासूरकर, जहीर शेख, मनोज ठोसर, अतुल संभे, वेतन कराडे, राजीक सयलीवाले, आणि सुरज चव्हाण यांच्या पथकाने केली.–

# अंतिम चौकशीसाठी पर्यवेक्षकांची नेमणूक:दर्यापूर पालिकेच्या मतदार याद्यांत गोंधळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०दर्यापूर**

नगर पालिकेच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गोंधळ झाल्याचे उघड झाले असून, एकूण ४११ आक्षेप नगर पालिका प्रशासनाकडे दाखल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आता पर्यवेक्षक नेमणूक करून अंतिम चौकशीची प्रक्रिया सुरू केली आहे. पर्यवेक्षकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मतदार याद्या अंतिम करण्यात येणार आहेत.

नगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीस वेग आला असून, नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या आरक्षणासह प्रभाग रचना निश्चित झाल्यानंतर आता मतदार याद्या हा पुढील टप्पा आहे. ८ ऑक्टोबर रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. मात्र, अनेक मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात गेल्याने किंवा काही प्रभागातील मतदार इतरत्र हलवले गेल्याने गोंधळ निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी मोठ्या संख्येने आक्षेप नोंदवले असून, प्रशासनाकडून १२ प्रभागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. प्रत्येक पथकात दोन कर्मचारी आणि एक बीएलओ यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी घराघरांत जाऊन पंचनामे करून माहिती प्रशासनाकडे सादर केली आहे. मतदार याद्यांतील गोंधळामुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली असून, अनेकांनी आपले नाव आणि पत्ता तपासण्याची विनंती केली आहे. प्रशासनानेही घराघरांत जाऊन सत्यापनाची प्रक्रिया सुरु केली आहे. या चौकशीमुळे चुकीची नोंद, पुनरावृत्ती (दोन ठिकाणी नाव ) समोर येणार आहेत. अंतिम अहवालानंतरच मतदार यादी ठरवली जाईल, ज्यामुळे आगामी नगर पालिका निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया योग्य आणि न्याय्य होईल. नागरिक आणि राजकीय पक्ष दोन्ही याकडे लक्ष ठेवून आहेत.



कोणत्या प्रभागात किती मतदार मतदार याद्या निश्चित झाल्यानंतर कोणत्या प्रभागात किती मतदार असणार आहेत. हे निश्चित झाल्यानंतर प्रभागात कोणत्या उमेदवाराचे प्राबल्य असणार आहे हे समजणार आहे, त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाचे मतदार अंतिम याद्यांमध्ये लक्ष लागून आहे. मतदार याद्यांतील गोंधळामुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. यामुळे आता या याद्यामधील हा गोंधळ दुर करण्यासाठी प्रशासनाला मोठी कसरत करावी लागणार आहे. या प्रकारामुळे नागरिकांनाही मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. यामुळे हा गोंधळ अडचणीचा ठरत आहे.

चुकीच्या प्रभागात नाव गेल्यामुळे भीती पालिका प्रशासनाने आक्षेपांची चौकशी करण्यासाठी परिवेक्षक नेमले आहेत. ते प्रत्यक्ष पाहणी करून अंतिम अहवाल सादर करतील. या अहवालानंतर मतदार यादी अंतिम करण्याची प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे आता या चौकशीच्या निष्कर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, नागरिकांमध्ये मतदार याद्यांच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चुकीच्या प्रभागात नाव गेल्यामुळे भीती व्यक्त केली जात आहे.

# अमरावती जिल्ह्याला मिळणार स्वतःचा पक्षी

## पक्षीमित्र संमेलनातून ठरणार निवड, संवर्धनासाठी ठरावही संमत होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती –** अमरावती येथे १ व २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनातून अमरावती जिल्ह्याला स्वतःचा पक्षी मिळणार आहे. या संमेलनाच्या आयोजक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. अंजली देशमुख आणि महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी बुधवारी माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली.अमरावतीत दुसऱ्यांदा आयोजित हे संमेलन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात पार पडणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष वरिष्ठ सनदी अधिकारी तथा प्रख्यात पक्षीमित्र प्रवीण परदेशी असतील. त्यांच्या उपस्थितीत राज्यभरातील पक्षीमित्र आपापल्या भागातील पक्षीवैभव सादर करतील आणि पक्षी संवर्धनासाठी




शासनाकडून अपेक्षित सहकार्याबाबतचा ठराव संमत करतील.

अमरावती जिल्ह्याचे वैभव असलेल्या मेळघाट जंगलात तणमोर, रानपिंगळा, सारस आणि माळढोक हे प्रमुख पक्षी आढळतात. याव्यतिरिक्त जिल्ह्याच्या विविध जंगलांमध्ये एकूण ४०० पक्ष्यांच्या प्रजाती असल्याचे यावेळी सांगण्यात आले. राज्यात एकूण ६०० पक्ष्यांच्या प्रजाती असून, देशभरातील पक्ष्यांची संख्या १ हजार ३३४ वर पोहोचली आहे.

आयोजकांच्या अंदाजानुसार, या संमेलनासाठी आतापर्यंत अडीचशे प्रतिनिधींनी नोंदणी केली असून, अखेरच्या क्षणापर्यंत ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. यावेळी वेक्सचे कोषाध्यक्ष डॉ. गजानन वाघ, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, सदस्य मनीष ढाकुलकर आणि ड. राजमेहेर निशाने उपस्थित होते.पक्षी निरीक्षण, वन्यजीव आणि वन क्षेत्रातील दिग्गज पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या स्मृती कायम राहाव्यात म्हणून संमेलनाच्या परिसराला 'पद्मश्री मारुती चितमपल्ली नगरी' असे नाव देण्यात आले आहे. तसेच, ज्या सभागृहात हा कार्यक्रम होईल, त्या सभागृहाला डॉ. सलीम अली यांचे नाव देण्यात आले आहे.

# शिक्षक बँक संचालक राणा गावंडे अखेर निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद शाळा मासोद येथे भेट दिली असता राणा गावंडे विषय शिक्षक हे शाळेत हजर नव्हते तसेच त्यांच्याबद्दल पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या अनेक तक्रारी होत्या सातत्याने सुट्टीवर जाणे वर्ग अध्यापनाची काम न करणे अशा अनेक तक्रारी गावकऱ्यांकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राप्त झाल्या होत्या त्या अनुषंगाने त्यांनी सदर शाळेला भेट देऊन प्रत्यक्ष शहानिशा केली व राणा गावंडे यांना निलंबित केले

राणा गावंडे यांची मूळ शाळा ही बोरगाव धर्माळे ही आहे तेथे देखील त्यांच्याविरोधात विद्यार्थी व गावकऱ्यांच्या खूप तक्रारी होत्या शाळेत न येणे विद्यार्थ्यांना न शिकवणे वारंवार सुट्टीवर जाणे त्यामुळे त्यांची प्रतिनियुक्ती ही जिल्हा परिषद शाळा इंधला येथे देण्यात आली होती तेथे देखील त्यांच्या खूप तक्रारी कार्यालयाला प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे पुन्हा त्यांना जिल्हा परिषद शाळा लोणटेक पंचायत समिती अमरावती येथे तात्पुरती प्रतिनिधी देण्यात आली होती तिथे देखील ते व्यवस्थित काम करू शकले नाही विशेष म्हणजे त्या शाळेवर त्यांच्या पत्नी देखील कार्यरत होते



सातत्याने वादाच्या मोहरत असलेले राणा गावंडे यांना वारंवार शाळा बदल करून द्यावा लागतच असे हे वादग्रस्त व्यक्तिमत्व अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नुकत्याच त्यांचा निलंबनाचा आदेश करून त्यांच्यावर डिपार्टमेंटल इन्क्वायरी सुरू करण्याचे निर्देश दिलेले आहे

राणा गावंडे शिक्षक सहकारी बँकेचे विद्यमान संचालक आहेत असे असताना ते सामान्य सभासदांचे चे प्रश्न कसे सोडवतील असा प्रश्न निर्माण झाला आहे तसेच त्यांच्या विसंगत भूमिकेमुळे सभासदांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झालेला आहे नुकतेच त्यांनी शिक्षक बँकेच्या अध्यक्षाच्या दालनावर आपला राजीनामा चिपकवला आहे सदर राजीनामा मध्ये त्यांनी बँकेमध्ये होत असलेला भ्रष्टाचाराचे कारण नमूद केले आहे विशेष म्हणजे राणा गावंडे यांनी शिक्षक बँकेच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये सर्व ठरावाला मंजुरात दिलेली आहे असे असताना बँकेमध्ये भ्रष्टाचार आहे असे म्हणण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही. निलंबनानंतर त्यांना पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर येथे पदस्थापना देण्यात आली आहे आता त्यांच्या डिपारमेंटल इन्क्वायरी मध्ये काय तथ्य बाहेर येते व ते शिक्षक म्हणून कायम राहतात की नाही याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे

आपल्यावर झालेली कार्यवाही यावर जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष विकेंद्रीत व्हावे म्हणून त्यांनी शिक्षक बँकेच्या विरोधात चर्चा सुरू केली आहे असे सर्वसामान्य सभासदांचे मत आहे.

# श्री महाराणा प्रताप चौकातील झुकलेला इलेक्ट्रिक पोल

## नागरिकांच्या जीवाशी खेळ, नगरपालिका प्रशासनाचे डोळे अजूनही मिटलेले!

विदर्भ प्रजासत्ताक दि.३०दर्यापूर १६

शहरातील महाराणा प्रताप चौक –नवीन नगरपालिका कार्यालया च्या बाजूला असलेला इलेक्ट्रिक पोल सध्या गंभीर धोक्याचे कारण ठरत आहे. या पोलचे सिमेंट फाउंडेशन पूर्णपणे तडकले असून, पोल एका बाजूला झुकलेला दिसत आहे.

अजूनही दुर्लक्ष केले जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दररोज या चौकातून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. शाळकरी मुलं, नागरिक आणि दोनचाकी वाहनचालक या पोलच्या



अगदी जवळून जातात. जर तो कोसळला, तर मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही

संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

प्रशासनाने तत्काळ जागे होऊन हा प्रश्न सोडवावा, अन्यथा कोणत्याही अनर्थाची जबाबदारी प्रशासनावरच येईल, असे नागरिकांनी स्पष्ट केले आहे. नगरपालिका प्रशासन याकडे लक्ष देणार का ? हे पाहणे योग्य ठरणार आहे.

# रब्बीसाठी ४७ हजार मे. टन खतांचे आवंटन मंजूर

## २२ हजार मैट्रिक टन शिल्लक; यंदा १ लाख ७४४५० हेक्टरवर नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अकोला–** रब्बी हंगामासाठी कृषी विभागाकडून कृषी निविष्ठांचे नियोजन करण्यात आले असून, ४७ हजार ६५० मे. टन खतांचे आवंटन मंजूर झाले आहे. सध्या २२ हजार १७७ मेट्रिक टन साठा शिल्लक आहे. खरीपमध्ये नुकसान झाल्याने पेरणी क्षेत्रही वाढणार आहे. कृषी आयुक्तालयाकडून जि. प. कृषी विभागाला रब्बी हंगाम २०२५-२६ साठी रासायनिक खतांचे आवंटनाला मान्यता प्रदान करण्यात आली. यंदा १ लाख ७४ हजार ४५० हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामाचे नियोजन आहे.



गत तीन वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचा फटका खरीप हंगामातील पिकांना बसत आहे. यंदाही खरीप पिकांचे नुकसान होत आहे.शिवाय मूग व उडीद या पिकांचा पेराही घटला. नुकसान झालेले क्षेत्र रब्बीमध्ये वाढत आहे. यंदा महिनाभर मान्सून विलंबाने दाखल झाल्याने उडीद, मूग पिके बाद झाली. सोयाबीनचीही अतिवृष्टीमुळे हानी झाली. अनेकांचा उत्पादन खर्चही निघालेला नाही. परिणामी कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढणार आहे.

अशातच रब्बी हंगाम तोंडावर आला. खरीपमधील नुकसानीमुळे यंदा रब्बी हंगामाचे क्षेत्र वाढण्याचा अंदाज आहे. त्यासाठी रासायनिक खतांचा साठा मंजूर झाला आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना पावसामुळे वेळेवर खतांची मात्रा देता आली नाही. त्याचा फटका पिकांना बसला. त्यामुळे आता रब्बी पिकांवरच शेतकऱ्यांची मदार आहे. यंदा १ लाख ७४ हजार ४५० हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामाचे नियोजन आहे. त्या अनुषंगाने कृषी विभागाला खत, बियाण्यांसह अन्य कृषी निविष्ठांचे नियोजन करावे लागणार आहे. त्यानुसार कृषी विभागाने खतांचे नियोजन केले आहे.

युरिया १५००० डीएपी ८७५० , एमओपी ३४०० , एसएसपी ५५०० , एनपीके १५०००, एकूण ४७६५०

# हरवलेले चार लाखाचे २७ मोबाईल दिले परत:अवधुतवाडी पोलिसांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०यवतमाळ–** नागरिकांचे हरवलेले महागडे २७ मोबाईल परत मिळवून देण्यास अवधुतवाडी पोलिसांना यश आले आहे. राज्यासह परराज्यात संपर्क साधून मोबाइल जप्त करण्यात आले. त्यानंतर तक्रारदारांना अवधुतवाडी पोलिस ठाण्यात बोलावून पोलिस निरीक्षक नरेश रणधीर यांच्या हस्ते मोबाइल देण्यात आले यावेळी पोलिस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. २०२३-२५ मध्ये नागरिकांचे गहाळ, चोरी झालेले



मोबाईल शोधण्याचे आदेश पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिले होते. त्यानुसार अवधुतवाडी पोलिसांकडून मोबाईल आणि चोरांचा शहरात आणि इतर जिल्ह्यांमध्ये तांत्रिक विश्लेषण करून शोध घेण्यात येत होता. शहरातील अवधुतवाडी पोलिसांनी चोरीला गेलेल्या, गहाळ झालेल्या मोबाईलच्या तक्रारी नोंदवून शोध घेतला असता, जवळपास पावणे चार लाख रूपयाचे २७ महागडे मोबाईल शोधण्यात अवधुतवाडी पोलिसांना यश आले.

दरम्यान ऑपरेशन प्रस्तान या सामाजीक उपक्रमांतर्गत अवधुतवाडी पोलिस ठाण्यात नुकतेच मंगळवारी दि. २८ ऑक्टोबरला एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान नागरिकांना त्यांचे हरविलेले मोबाईल परत करण्यात आले. संबंधित मोबाईल फोन वापरकर्त्यांशी संपर्क करून हिंदी, मराठीसह विविध भाषामध्ये संवाद साधून हरवलेले २७ मोबाईल फोन ताब्यात घेतले.हरवलेले मोबाईल फोन संबधीत तक्रारदारांना परत मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. ही मोहीम अवधुतवाडी ठाणेदार नरेश रणधीर, कर्मचारी आशिष भुसारी, गजानन दुधकोहळे, योगेश चोपडे यांनी पार पाडली.

# 'ट्रॅव्हल्स चालकांची दिवाळी' प्रवाशांचे दिवाळे

## ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून लूट; प्रवाशांना सहा पट भाडेवाढीचा भूर्दंड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती–** अमरावती मधून पुण्याकडे प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स कंपन्या दिवाळीत परतीच्या मार्गावरील प्रवाशांची लूट करत आहेत. ट्रॅव्हल्स चालकांनी गर्दीचा फायदा घेत भाड्यात तब्बल सहा पट भाडे वाढ केली आहे. प्रवासी वेळेत परत पोहोचण्यासाठी नाइलाजाने हे भाडे देऊन प्रवास करत आहेत. प्रवाशांना भूर्दंड सहन करावा लागत असल्याने नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.मात्र अमरावती प्रादेशिक परिवहन विभाग नेहमी प्रमाणे कोमात गेला असल्याचे समोर आले आहे.

शहरातून पुण्यासाठी ये- जा करणाऱ्या २५ ते ३० पेक्षा अधिक ट्रॅव्हल्स कायमस्वरूपी प्रवासी वाहतूक करत आहेत. शहरातील अनेक ठिकाणी या ट्रॅव्हल चालकांनी तिकीट बुक करण्यासाठी आपआपली दुकाने थाटली आहेत. जी मंडळी या दुकानापर्यंत येवू शकत नाही ती मंडळी ऑनलाइन रेड बस वर

### प्रादेशिक परिवहन विभाग कोमात

तिकीट बुक करु शकते. रेड बस व या दुकानात थोडफार दरात फरक पडतो, त्यामुळे अनेक मंडळी ही ऑनलाइन बुकींगलाच पसंती देते. परिणामी ट्रॅव्हल मध्ये सातत्याने गर्दी होत आहे. या ठिकाणाहून प्रवासी वाहतूक करणाऱ्या महामंडळाच्या अनेक बस या रिकाम्या धावत असतात. या वाहतुकीमुळे महामंडळाला चांगलाच फटका बसतो. सुरुवातीला कमी भाडे आणि



अधिक सुविधांचे आमिष दाखवत या खासगी ट्रॅव्हल्सने आपल्याकडे प्रवासी खेचण्यात यश प्राप्त केले आहे. परंतु सण, उत्सव आला की शहरातून नागरिकांची गर्दी वाढत असते.

**ट्रॅफिक वर तिकिटाचा दर अवलंबून–** आपाआपल्या गावी आलेली मंडळी ही परत जात असल्याने ट्रॅव्हल मध्ये गर्दी आहे. त्यामुळे जाण्याचा दर हा जास्त आहे. सध्या पुणे येथे जाण्यासाठी किमान ३००० रुपये तिकीट दर आहे. तर सध्या येणाऱ्या मंडळींची संख्या कमी असल्याने येण्याचा दर हा केवळ २५०० रुपये असा आहे.

**सर्व नियम धाब्यावर**

सर्व नियम धाब्यावर बसवून ट्रॅव्हल्स चालकांची मनमानी सुरु असून याकडे आरटीओचे दुर्लक्ष होत आहे. नुकत्याच स्लीपर असलेल्या वेगवेगळ्या दोन बसला आग लागल्याने ४० जणांचा होरपळून मृत्यू झाला. ही घटना या अशाच प्रकारे प्रवासी वाहतूक करणाऱ्या स्लीपर मधील होत्या. वास्तविक पाहता शहरातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्वच ट्रॅव्हल्स या स्लीपर आहेत. आग लागल्यास विझवण्याची सामग्री आहे की नाही? यासारख्या अनेक गोष्टी प्रवाशांना तर माहिती नाहीतच.

# एकाच भागात पाच वेळा सीसीटीव्हीमध्ये कैद झाला बिबट्या

## कुत्रे भुंकताच फटाके फोडून बिबट्यांना हाकलत आहेत नागरिक

## वरूण नगरमध्ये २० ऑक्टोबरपासून निर्माण झाली आहे दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती –** महादेवखोरी परिसरातील वरूण नगर भागात २० ऑक्टोबरपासून एक मादी बिबट्या आणि तिची दोन पिल्ले शिकाराच्या शोधात सतत फिरताना दिसत आहेत. या मादी बिबट्याला आणि तिच्या पिल्लांना पकडण्यासाठी वनविभागाने सलग पाच दिवस त्या परिसरात पिंजरा लावला जिथे बिबट्या दिसला होता, पण बिबट्या पिंजर्यात येत नाही. त्यामुळे परिसरातील लोक रात्री कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आला की फटाके फोडून बिबट्यांना पळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर वनविभागाने रात्रीच्या वेळी गस्तही वाढवली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरूण नगर भागात सर्वप्रथम २० ऑक्टोबरच्या रात्री २.१६ वाजता मादी बिबट्याने एका कुत्र्याचा शिकार केला आणि तिथून पळून गेल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसले. त्या बिबट्याच्या मागे एक कुत्राही काही अंतर



धावताना दिसला.यानंतर २५ ऑक्टोबरच्या रात्री १.५७ वाजता तीच मादी बिबट्या आणि तिची दोन पिल्ले त्या भागात पुन्हा शिकाराच्या शोधात फिरताना दिसली. दुसऱ्या दिवशी, म्हणजेच २६ ऑक्टोबरला रात्री १.०७ वाजता तीच बिबट्या आणि तिची दोन पिल्ले त्याच परिसरात दिसली. त्यानंतर २७ ऑक्टोबरला संध्याकाळी ७ वाजता काही लोकांना बिबट्या दिसला, आणि त्याच रात्री १.५० वाजता बिबट्या आणि तिची दोन पिल्ले पुन्हा त्या भागात फिरताना दिसली, तसेच २.०८ वाजता हे बिबट्याचे कुटुंब पुन्हा परतताना सीसीटीव्हीमध्ये दिसले.

वनविभागाने वरूण नगर परिसरात बिबट्या आणि तिची पिल्ले ज्या ठिकाणी सीसीटीव्हीमध्ये कैद झाली, त्या सर्व फुटेजची नोंद घेतली आहे.

### पकडण्यासाठी वाढवली गस्त

वरूण नगर भागात एका घरावर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या आणि तिची दोन पिल्ले पाच वेळा कैद झाली आहेत. त्यामुळे आता बाहेर कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आला की लोक फटाके फोडून बिबट्याला पळवण्याचा प्रयत्न करत आहेत. बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने आपली गस्त वाढवली आहे.

महेश धंदर, वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती विमानतळावर आगमन व स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दुपारी अमरावती विमानतळावर आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री महोदयांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. जिल्हा प्रशासनाच्यावतीने विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे स्वागत केले.

यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, आमदार केवलराम काळे, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद आदी उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींना ई केवायसीसाठी १८ नोव्हेंबरची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी येत्या १८ नोव्हेंबरपूर्वी ई केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. महिलांनी या कालावधीत आपले ई केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी आणि लाभार्थी महिलांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा यासाठी ई केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात




आली आहे. या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणण्याबाबत अदिती तटकरे यांनी बुधवारी मंत्रालयात बैठक घेतली.

१८ सप्टेंबर २०२५ पासून श्रवरज्ञळलरहळप.ारहीरिहीर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर ई केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी २ महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून आतापर्यंत बहुतांश लाडक्या बहिणींनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. उर्वरित लाभार्थी महिलांनी १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी ई केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तटकरे यांनी केले आहे.लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकारने कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाखाच्या आत असावे अशी अट टाकली आहे. मात्र अनेक अपात्र महिला या योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले आहे. त्यांना वगळण्यासाठी राज्य सरकारने ई केवायसी बंधनकारक केले आहे.

# पिंपळखुटा सर्कलमधून हितेश साबळे यांची जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दावेदारी पक्की

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील पिंपळखुटा मोठा जिल्हा परिषद सर्कलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) कडून युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे हितेश साबळे यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दावेदारी निश्चित केली आहे. त्यांच्या दावेदारीला स्थानिक पातळीवर मोठा प्रतिसाद मिळत असून, पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.हितेश साबळे यांनी शेतकरी चळवळीमध्ये देवेंद्र भुयार यांचं बोट धरून राजकारणामध्ये प्रवेश केला असून स्वाभिमान निष्ठा आणि प्रामाणिकपणा हे राजकारणातील त्यांचं वैशिष्ट्य असून आयुष्यातील बारा वर्षाच्या प्रवासामध्ये देवेंद्र भुयार यांच्यासोबत राहून शेतकऱ्यांसाठी केलेला संघर्ष, शेतकरी चळवळीपासून ते विधानसभेच्या प्रवासापर्यंत काम



करण्याचा संपूर्ण अनुभव असून गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी चळवळीमध्ये शेतकरी हितासाठी शेतकऱ्यांना न्याय मिळून देण्यासाठी अनेक आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्या असून हितेश साबळे विश्वासू कार्यकर्ते म्हणून सक्रिय असून, जनतेच्या प्रश्नासाठी त्यांनी सतत आवाज उठविला असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये त्यांच्याप्रती सहानुभूती निर्माण झालेली आहे.हितेश साबळे हे जनतेच्या प्रश्नांसाठी सतत आवाज उठवत असून त्यांच्या प्रामाणिक आणि जनसंपर्कशील स्वभावामुळे ते मोर्शी तालुक्यामध्ये लोकप्रिय झाले आहेत. विशेष म्हणजे, मोर्शी विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या शेतकरी चळवळीमध्ये तयार झालेले असून देवेंद्र भुयार यांचे ते अत्यंत निकटवर्तीय आणि विश्वासू कार्यकर्ते आहेत. देवेंद्र भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली हितेश साबळे यांनी पक्षविस्तार आणि जनसेवा यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. स्थानिक नागरिकांनीही हितेश साबळे यांच्या उमेदवारीचे स्वागत करत जनतेचा माणूस अशी प्रतिक्रिया दिली आहे.कृषी मंत्र्यांच्या विरोधातील आंदोलन उपोषण चिकाटी जिद्द मेहनत तळागाळातील गोरगरिबांबरोबर असलेला संवाद आणि बारा वर्षापासून पिंपळखुटा मोठा जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व लोकांबरोबर ठेवलेला संपर्क व सततच्या कामांच्या भारोश्यावर संधी मिळेल अशी आशा हितेश साबळे यांनी व्यक्त केली.

# जनतेच्या दारी, पुन्हा हजेरी भारी

## शहरातील प्रभागात स्वयंघोषित पदव्यांनी सजलेले फलक आणि बॅनर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

महापालिका निवडणुकीची चाहूल लागताच शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. अमरावती मतदारसंघांतील सर्वच प्रभागांमध्ये इच्छुक उमेदवारांची चळवळ जोमात सुरू झाली आहे. गेल्या पाच वर्षात मतदारसंघात कोणतेही ठोस सामाजिक कार्य न करणारे अनेकजण आता 'जनसेवक', 'आपला माणूस', 'लोकसेवक', 'युवा नेते', 'सामाजिक कार्यकर्ते' अशा स्वयंघोषित पदव्यांनी सजलेले फलक आणि बॅनर लावून नागरिकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहेत.शहरातील गल्लीबोळ, चौक, बाजारपेठा आणि सोसायट्यांच्या भिंतींवर शुभेच्छा बॅनर, वाढदिवसाचे पोस्टर आणि 'जनतेचा सेवक' अशी घोषणा असलेले फ्लेक्स झळकताना दिसत आहेत. सोशल मीडियावरही या स्वयंघोषित नेत्यांचा प्रचार जोरात सुरू असून, फोटोशूट, व्हिडीओ पोस्ट आणि रील्सच्या माध्यमातून 'जनतेत आपलेपणा' निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.या शिवाय गेल्या ५ वर्षात नागरिकांच्या समस्यांसाठी महापालिकेकडे साधे एक निवेदन न देणारे काही जण आता अचानकच सक्रिय सामाजिक कार्यकर्ते बनले आहेत. अनेकांनी रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठा, कचरा, ड्रेनेज, आरोग्य, वाहतूक कोंडी, विविध विकासकामांच्या मुद्द्यांवर निवेदने देण्यास सुरुवात केली आहे.

**'पाच वर्षे नजरेआड अन् आता लोकसेवक'**

नागरिकांमध्ये या अचानक वाढलेल्या सामाजिक सक्रियतेबद्दल मिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सोशल मीडियावर नागरिक उघडपणे याबाबत व्यक्त होताना दिसत आहेत. पाच वर्षे नजरेआड असलेले हेच आता लोकसेवक कसे बनले? असा प्रश्न मतदार विचारत आहेत.

# वारकरी साहित्य परिषदेची आढावा बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०कुऱ्हा**

वारकरी साहित्य परिषदेच्या चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त २७ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात संत मुक्ताई, जनाई, बहिणाई महिला हरिपाठ मंडळाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धाच्या पूर्व नियोजनाबाबत वारकरी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल पाटील काकाजी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच १६ ऑक्टोबरला छत्रपती संभाजीनगर येथे आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीत वारकरी साहित्य परिषदेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची कार्यशाळासुद्धा घेण्यात आली. ज्यामध्ये व्यसनमुक्ती, जादूटोणा ४ अंधश्रद्धाविरोधी प्रचारासाठी संत मुक्ताई,जनाई व बहिणाई महिला मंडळाच्या माध्यमातून कशा पद्धतीने कार्य करता येईल, यावर मार्गदर्शन करण्यात आले. या आढावा बैठकीला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ हे उपस्थित होते. त्यांनी याप्रसंगी उपस्थित सर्व वारकरी महाराज मंडळी, पदाधिकारी, तथा कार्यकर्ते यांच्याशी आत्मीयतेने संवाद साधला. संस्थापक अध्यक्ष विठ्ठल पाटील काकाजी यांनी गावोगावी पुरुष व महिला हरिपाठ मंडळांची निर्मिती व्हावी, विशेष म्हणजे नहिला हरिपाठ मंडळांची अधिकाधिक निर्मिती गावोगावी व्हावी, जेणेकरून आपला महाराष्ट्र, आपली येणारी पिढी सुसंस्कारी विचार घेऊन चालणारी असावी, असे सांगितले.

अमरावती जिल्ह्याच्यावतीने पुरुष जिल्हाध्यक्ष ह.भ.प. किशोर महाराज उगले, तथा महिला जिल्हाध्यक्ष ह.भ.प. सौ. यामिनीलाई मेहरे, अमरावती महानगर अध्यक्ष महिला सौ. वर्षाताई तिडके, पुरुष महानगर अध्यक्ष रवी कळसकर, ह. भ. प. गजानन महाराज हिरुळकर, ह.भ.प. प्रकाश महाराज नेवारे, ह.भ.प. सोनेकर महाराज, ह.भ.प. प्रितम महाराज झोंबाडे, ह.भ.प. वैष्णव महाराज ढोमणे, श्रीमती चंदाताई कोल्हे, उज्वलाताई देशमुख, सविताताई कनेरकर, दीपिकाताई घोटे, सुवर्णाताई मेहरे, चंदालाई ढगे, सोनूलाई अवघड, कमलाबाई लंगोटे, कल्पनाताई लंगोटे, वैष्णवीलाई मेहरे ही सर्व मंडळी अमरावती जिल्ह्याच्यावतीने आढावा बैठकीस उपस्थित पुरुष होती.

# पथ्रोट जिल्हा परिषद सर्कलमध्ये २४ हजार ३८९ मतदार; १३ गावांसह ७ ग्रामपंचायतींचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पथ्रोट**

पथ्रोट जिल्हा परिषद सर्कलमध्ये एकूण १३ गावे आणि ग्राम पंचायती समाविष्ट आहेत. मतदारसंख्या २४ हजार ३८९ असून त्यामध्ये पुरुष मतदार १२ हजार ५४६ तर स्त्रिया मतदारांची संख्या ११ हजार ८४३ आहे.२००२ मध्ये सदर सर्कल सर्वसाधारण उमेदवारकरीता राखीव होते त्यामध्ये भाजपाचे प्रदीप हरणे विजय झाले होते. मागील निवडणुकीत सदर सर्कल अनुसूचित जाती उमेदवारांकरिता राखीव होते. त्यामध्ये भाजपच्या आशा वानरे यांनी सर्वांत जास्त ७ हजार ६० मते मिळवून विजय संपादन केला. पथ्रोट गटांतर्गत पथ्रोटसह परसापूर या पंचायत समिती गणांचा समावेश आहे. पचोट पंचायत समिती सर्कल एससी महिला राखीव होते.



यामध्ये सुनीता दांडगे यांना ३ हजार ३५६. अनिता तानोरकर यांना १ हजार ००८ मते मिळाली परसापूर पंचायत समिती सर्कलमध्ये भाजपाचे विशाल काकड, काँग्रेसचे रणजीत बाजोले, राष्ट्रवादी पक्षाचे अनुप अरवट आणि शिवसेनेचे खुशाल गायन निवडणूक रिंगणात होते. त्यामध्ये भाजपाचे विशाल काकड यांना २ हजार ९८२, काँग्रेसच्या रणजीत बाजोले यांना २ हजार १३५ मते मिळाली होती. २००२ नंतर प्रथम सदर जिल्हा परिषद सर्कल आणि त्या अंतर्गत असलेले दोन्ही पंचायत समिती सर्कलचे आरक्षण सर्वसाधारण आहे. त्यामुळे या सर्कलमध्ये पुन्हा रणधुमाळी पाहायला मिळण्याची शक्यता आहे. यावेळी सदर निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या दोन पक्षांमध्ये लढत होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट यांचा सुद्धा उमेदवार रिंगणात राहू शकती. जर काँग्रेस राष्ट्रवादी आणि शिवसेना उद्धव काळासाहेच ठाकरे वट यांची युती झाली आणि मतांचे विभाजन झाले नाही तर तीनही सर्कलमध्ये तुल्यबळ लदत होऊ शकते. मात्र राजकीय पक्ष कुणाला उमेदवारी देणार वावरही बरेचसे अवलंबून राहणार आहे.

# मिक्सरच्या आवाजातही जाते - पाट्यांचा सुर कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मोर्शी**

मनगटाच्या जोरावर हातोडा व छन्नीच्या मदतीने दगडावर घाव घालून घरातील अत्यंत महत्त्वाचा समजणारा घटक म्हणजे जाते व पाटे साकारणारा पाथरवट बांधव आजच्या घडीला मोर्शी शहरातील मुख्य रस्त्यावर दगडाचे जाते व पाट्याचे दुकान लावून आपले अस्तित्व टिकवून ठेवत आहे.विशेष म्हणजे दिवसेंदिवस माणसाच्या खाण्यापिण्याच्या सवयी बदलत असून कालानुरूप स्वयंपाक घरातील साहित्यसुद्धा आधुनिक होत आहे; मात्र ग्रामीण भागात आजही मसाला



करण्यासाठी दगडी पाट्याचा वापर केला जातो.रानावनात, धरणी मायच्या विशाल उदरात दडून बसलेल्या दगडाचा हे कारागीर शोध घेतात. आपल्या कलेद्वारे या दगडातून विविध साहित्य तयार करतात. याच दगडातून ते मूर्तीसुद्धा तयार करतात.

या कलाकारांच्या घामातूनच या देवांना पहिला अभिषेक घडतो. या कारागिरांनीच साकारलेले देव श्रीमंत मंदिरांमध्ये विराजमान आहेतः मात्र दगडाला देवपण देणाऱ्या या समाजाची दैना सुरू आहे. पवनसूत मारुतीरायासह नंदी, पिंड, शंकर यासह नानाविध मूर्ती हे कारागीर घडवितात.

# भक्तिभावाने संत आडकुजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाचा शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तिवसा**

श्री समर्थ आडकुजी महाराजांचा १०४ व्या पुण्यतिथी महोत्सवास श्रीक्षेत्र वरन येथे महासमाधीस सूरज विनायक बोके यांच्याहस्ते श्री संत सयाजी महाराज संस्थानाध्यक्ष अभिजित बोके यांच्या प्रमुख उपस्थितीत तीर्थस्थापना, चरण पादुका पूजन व महासमाधी अभिषेकाने 'जय गुरुदेव' च्या गजरात धार्मिक व विधिवत प्रारंभझाला. याप्रसंगी



समाधीस्थळी पहाटे परिसरातील हजारो गुरुदेवभक्तांची उपस्थिती होती.

यावेळी पवित्र भजन, मंत्रघोष व शंखनादाने परिसरातील वातावरण भक्तीमय झाले होते. तीर्थस्थापनेनंतर सामुदायिक ध्यानाचा कार्यक्रम महासमाधी स्थळी घेण्यात आला.वरखेड येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृह व कार्यक्रमाचे ठिकाणी गुरुदेवांचेअधिष्ठान मांडून याचे पूजन संजय मार्डीकर व मोनिका मार्डीकर वानखडे संचालक दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्याहस्ते करण्यात आले.याप्रसंगी प्रसाद मार्डीकर सौ. वैष्णवी चौधरी यांची उपस्थिती होती. हभप गजानन बोके महाराज यांनी सामुदायिक ध्यानाच्या महत्त्वावर चिंतन प्रस्तुत केले. गावातून रामधून काढण्यात आली, तसेच गौरव बोके व सुमिरान यांच्या कडून अन्नदान पार पडले. सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व भाषण मुकुंद पुनसे यांनी करून राष्ट्रसंतांच्या सामुदायिक प्रार्थनामधून सर्वधर्म समभाव या विचारांची महती स्पष्ट केली.

# आज सायंकाळी सात वाजता बच्चू कडू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात बैठक

## सहा जणांचे शिष्टमंडळ घेऊन बच्चू कडू मुंबई रवाना आंदोलनाला मनोज जरांगे यांनी दिली भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

मुख्यमंत्र्यांनी चर्चेला मुंबईत बोलविले आहे. मी आणि सहा जणांचे शिष्टमंडळ जात आहोत. काही निर्णय होतील, घेतले जातील ते कोणाला पटणार नाहीत, कोणाला पटतील. आपण आंदोलन उभारले आहे. ते सोपे नाही. परंतू, आंदोलनाच्या मूळ मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही, असे शेतकरी आंदोलनाचे नेते माजी आमदार बच्चू कडू यांनी सांगितले.



या आंदोलनाला मनोज जरांगे यांनी भेट देत पाठिंबा दिला. मी इथे शेतकऱ्याचा मुलगा म्हणून आलो आहे. सरकारने टाकलेला डाव कसा मोडायचा, यासाठी प्रतिडाव टाकावा लागेल. आमचेही आंदोलन होते. तुम्ही उभे आयुष्य शेतकरी आंदोलनात खर्च केले आहे. मुंबईच्या बैठकीबाबत मला माहिती नाही. मी त्यात पडणार नाही. जा किंवा नका जाऊ असे मी सांगणार नाही. मी अंतरवालीची बैठक रद्द केली. काल मला खूप वाईट वाटले, पहिल्याच दिवशी सरकारने कोर्टाचा डाव टाकला. कडू म्हणत होते तुम्हीही चला मुंबईला, मी म्हटले नाही. त्यांना इकडे यायला काय झालेय, असा सवाल मनोज जरांगे यांनी विचारला.

आज सायंकाळी सात वाजता बच्चू कडू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात बैठक होणार आहे. या आंदोलनाच्या संपूर्ण कर्जमाफीसह २२ प्रमुख मागण्यांवर चर्चा होणार आहे. शेतकरी आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वात सुमारे दहा हजारांहून आंदोलक सहभागी झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रजनीश व्यास यांनी बुधवारी जनतेला होणाऱ्या त्रासाची गंभीर दखल घेत स्वतःच जनहित याचिका दाखल करून घेतली. तसेच, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी कडू व इतर आंदोलकांना वर्धा रोड व इतर सर्व रस्ते तातडीने मोकळे करण्याचा आदेश दिले.

# अमरावती ग्रामीण पोलिस दलात २१४ शिपायांसाठी होणार भरती; जाणून घ्या कोणाला किती पदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती ग्रामीण पोलिस दलाच्या आस्थापनेवर पोलिस शिपायांच्या २१४ रिक्तपदांसाठी भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी ती आनंदवार्ता दिली आहे. २९ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत त्या पदांसाठी आवेदन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. ती संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. २१४ रिक्त पदांपैकी एकूण ६४ पदे ही महिलांसाठी राखीव असणार आहेत.




जिल्हा ग्रामीण पोलिस दलाच्या अखत्यारीत तूर्तास ३१ पोलिस ठाणे, सहा उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालये, एसपी कार्यालय, गुन्हे शाखा, विशेष शाखा, वाहतूक शाखा व अन्य अकार्यकारी शाखा आहेत. मात्र, जिल्ह्याचा व्याप वाढला असताना जिल्हा पोलिस दलात रिक्त पदांचा अनुशेष निर्माण झाला होता. मात्र, आता ती संपूर्ण २१४ पदे भरती प्रक्रियेद्वारे भरली जाणार आहेत. त्यामुळे अमरावती ग्रामीण पोलिस दलातील अनुशेष भरून निघणार आहे.

**... येथे करा तक्रार**

जिल्हा पोलिस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी त्वरित संपर्क साधून तक्रार करावी. यासंदर्भात पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलिस भरती समिती-२०२४/२५ तथा पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्याशी संपर्क साधून तक्रार दाखल करू शकता.

**कुणासाठी किती पदे ?**

अ.जा. : ३, अ.ज. : २०, वि.ज.अ : १३, भ.ज.ब : २, भ.ज.क: ७, भ.ज. ड : १०, विमाप्रः ३, इमाव : २८, एसईबीसी : २५, ईडब्लूएस : ८, खुला : ९२५. सर्वसाधारण : ६९, महिला : ६४, खेळाडू : १०, प्रकल्पग्रस्त : १०, भूकंपग्रस्त : ४, माजी सैनिक : ३१, अंशकालीन पदवीधर : १०, पोलिस पाल्य : ६ व गृहरक्षक दल : १०

# ५०५ जणांवर बनावट व खोट्या कागदपत्रांच्या आधारे फसवणुकीचा गुन्हा दाखल

## आरोपींनी सादर केलेल्या कागदपत्रांतील पत्ते चुकीचे असल्याचे आढळले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

अमरावती महानगरपालिकेने शहरात मोठ्या प्रमाणावर बनावट प्रमाणपत्रांचा गैरवापर झाल्याचा तपास सुरू केला आहे. या तपासादरम्यान ५०५ जणांनी खोटी व बनावट कागदपत्रे वापरून विविध शासकीय लाभ मिळविल्याचे समोर आले. त्यामुळे मनपाने सोमय्या यांच्या भेटीपूर्वीच सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात औपचारिक तक्रार दाखल केली.



प्राथमिक चौकशीत असे दिसून आले की अनेक अर्जदारांनी सादर केलेल्या ओळखपत्रांवरील व पत्त्यांवरील माहिती खोटी आहे. काही प्रकरणांमध्ये एकाच पत्त्यावर अनेक व्यक्तींची नावे आढळल्याने फसवणुकीचा संशय बळावला आहे.या प्रकरणात नामनिर्दिष्ट ५०५ जणांमध्ये अनेक महिला असून, विशिष्ट समुदायातील लोकांचा मोठा सहभाग असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.सध्या पोलिसांनी सर्व संबंधित कागदपत्रे जप्त केली असून, दस्तऐवजांची सत्यता पडताळण्यासाठी तपास सुरू आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मनपा अधिकाऱ्यांनी सांगितले.

# आमदार सुपुत्रांची निवडणुकीच्या रिंगणात होणार एन्ट्री?

## एकाची ग्रामीण मध्ये तर दुसऱ्याची शहरांमध्ये लॉबिंग सूरु

**(सचिन पाटील अब्रुक)**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव सुर्जी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून जागोजागी बॅनर लाऊन इच्छुक उमेदवारांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या जात आहे.अंजनगाव सुर्जी तालुक्याला सद्या स्थितीत दोन आमदार लाभले आहेत आमदार गजानन लवटे विधानसभेवर निवडून आले आहे तर दुसरे आमदार ज.मो. अभ्यंकर विधान परिषदेवर निवडून आले आहे. विशेषता दोन्ही आमदार शिवसेना ठाकरे गटातून निवडून आले आहे.आमदार लवटे व आमदार अभ्यंकर यांचे सुपुत्र निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती साठी आरक्षित असल्यामुळे



आमदार लवटे यांचे सुपुत्र यश लवटे नगराध्यक्ष पदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. तर विधान परिषद सदस्य आमदार ज.मो. अभ्यंकर यांचे गाव विहीगाव जिल्हा परिषद सातेगाव गटात येत असून हा गट अनुसूचित जाती साठी आरक्षित असल्यामुळे त्यांचे सुपुत्र प्रशांत अभ्यंकर जिल्हा परिषदेच्या निवडणूकीच्या मैदानात उतरवण्याची शक्यता असुन ही पहिलीच वेळ असेल अंजनगाव तालुक्यात दोन्ही आमदार सुपुत्र निवडणुकीच्या रिंगणात पाहण्याची त्यामुळे या निवडणुकीकडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले आहे.

**दोन्ही सुपुत्रांची निवडणूक आखाड्याची परिक्षा**

आमदार लवटे आणि आमदार अभ्यंकर यांच्या सुपुत्रांची निवडणूक आखाड्यात उतरण्याची पहिलीच वेळ असून दोन्ही सुपुत्रांना राजकीय डावपेचा कोणताही अनुभव नाही त्यामुळे दोन्ही उमेदवारांना एक सुशिक्षित उमेदवार म्हणून मतदारांत आपली छाप पाडावी लागणार असून दोन्ही आमदार सुपुत्रांची निवडणुकीच्या आखाड्याची अग्नीपरिक्षा असणार आहे या परिक्षेत कोण पास होणार कोण नापास होणार निकाल जाहीर झाल्यानंतर समजणार आहे

**एक ग्रामीण मध्ये तर दुसरा शहरामध्ये**

दोन्ही आमदार सुपुत्र वेगवेगळ्या राजकारणाच्या आखाड्यात लॉचिग होणार असून एक शहरी तर दुसरे ग्रामीण राजकारणात सक्रिय होणार आहे.लवटे पुत्राला शहरातील मतदार पक्षाच्या आधारावर मतदार जुळवाजुळव करा लागेल तर ग्रामीण मधुन अभ्यंकर पुत्राला गटातटाचे मतदार जुळवाजुळव करावे लागेल. त्यामुळे दोन्ही आमदार सुपुत्रांना वेगवेगळ्या पद्धतीने राजकारण खेळून आप आपले नशीब आजमावणार लागेल.

# एलपीजीवर वाहन चालवता; मग, हायड्रो टेस्ट केली काय ?

## आरटीओ विभागाचा नियम पण होतेय दुर्लक्ष पाच वर्षांनी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

वाहनांत इंधन म्हणून पेट्रोल, डिझेलबरोबरच सीएनजी, एलपीजीसारख्या गॅसचाही वापर केला जात आहे. सीएनजीवर चालणारी चारचाकी, तीनचाकी आणि दुचाकी वाहने विक्रीसाठी बाजारात उपलब्ध आहेत. इतर वाहनांप्रमाणे या वाहनांना देखील आरटीओ विभागाचे नियम लागू आहेत. त्यात एलपीजी गॅसवर चालणाऱ्या वाहनांनी दर पाच वर्षांनी हायड्रो टेस्ट करणे बंधनकारक असते, मात्र बरेच वाहनधारक अशी टेस्ट करीत नसल्याचे दिसून येते.



अनफिट सिलिंडरमध्ये गॅस भरल्यास स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडू शकते. अशा स्वरूपाच्या घटना आजवर विविध ठिकाणी घडल्यासुद्धा आहेत. त्यामुळेच आरटीओ विभागाने नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या वाहनांवर दंड आणि शिक्षेची तरतूद केली आहे.एलपीजी वाहन वापरणाऱ्या वाहनधारकाने दर पाच वर्षांनी हायड्रो टेस्ट करावी, असा नियम आहे. हा नियम मोडल्यास विविध प्रकारचे दंड आणि शिक्षेची तरतूद मोटार परिवहन कायद्यांतर्गत करण्यात आली आहे. पेट्रोल, डिझेल वाहनांसोबतच सीएनजी, एलपीजी आणि इलेक्ट्रिक वाहनांची गेल्या काही वर्षात रस्त्यांवर गर्दी वाढली आहे.

**दर तीन वर्षांनी टाकी तपासणे आवश्यक**

शासनाने पेट्रोल पंपाप्रमाणेच सीएनजी, एलपीजीचे पंप उघडण्यास मान्यता दिली आहे. नियमानुसार याच ठिकाणी वाहनात गॅस भरणे आवश्यक आहे; मात्र सीएनजी वाहनाच्या टाकीची दर तीन वर्षांनी तपासणी करणे अनिवार्य आहे.

**नियमांकडे होतेय दुर्लक्ष**

दुचाकी आणि चारचाकी वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पेट्रोल, डिझेलचे दर गगनाला भिडल्याने नागरिक एलपीजी, सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहने खरेदी करत आहेत; परंतु वाहनासंबंधी लागू असलेले नियम पाळण्याकडे कानाडोळा केले जाते.

# पावसातही शेतकऱ्यांचा संघर्ष कायम

## उपमुख्यमंत्र्यांना दाखवले काळे झेंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तळेगाव दशासर**

अमरावती जिल्ह्यातील तळेगाव दशासर येथे आज शेतकऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त केला. यवतमाळ येथील सभा संपवून अमरावतीकडे जात असताना हा प्रकार घडला.सकाळपासून जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू



असतानाही शेतकरी रस्त्यावर उतरले होते. पावसाची पर्वा न करता त्यांनी हातात काळे झेंडे घेत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.शेतकऱ्यांनी या वेळी सरकारने तातडीने कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी केली. जोपर्यंत कर्जमाफी मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन विविध मार्गांनी सुरू ठेवू, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला.

# मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी घेतली अरुणभाऊ अडसड यांची सदिच्छा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धामणगाव रेल्वे**

विदर्भात जनसंघानंतर भारतीय जनता पार्टीचे संघटन शक्ती वाढविणारे विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अरुणभाऊ अडसड यांची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी अमरावती येथील अरुणोदय निवासस्थानी येऊन सदिच्छा भेट घेतली.

विदर्भात भारतीय जनता पक्ष खामगाव ते आमगाव पर्यंत वाढविण्यासाठी अरुणभाऊ अडसड यांचा मोलाचा वाटा आहे त्यांनी घराघरात भाजप पोहोचविला १९९५ मध्ये भाजप युतीच्या काळात अरुणभाऊ अडसड हे विदर्भ वैज्ञानिक विकास मंडळाचे अध्यक्ष असताना विदर्भातील अनेक रस्ते प्रकल्प मार्गी लावले होते ते आमदार असताना विविध मागण्या व प्रश्न विधानसभेत मांडून मंजूर करून घेतले होते .आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी अमरावती येथील अरुणोदय निवासस्थानी येऊन त्यांची भेट घेतली दोघांमध्ये वीस मिनिट चर्चा झाली यावेळी जुन्या आठवणींना उजाळा मिळाला यावेळी गृह राज्य मंत्री पंकज भोयर,आ प्रतापदादा अडसड, आ राजेश वानखडे, आ रवी राणा, आ प्रवीण तायडे, माजी मंत्री प्रवीण पोटे,रविराज देशमुख,प्रतिभाताई अडसड, रावसाहेब रोठे,अर्चनाताई (अडसड)रोठे व अडसड कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# सरकारचे सोयाबीनची शासकीय खरेदीचे आश्वासन हवेत अद्याप नोंदणीच नाही

## नांदगाव तालुक्यातील नोंदणीसाठी आलेले शेकडो शेतकरी आल्या पावली परत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नांदगाव खंडेश्वर**

ऑक्टोंबर पासून सोयाबीनची शासकीय खरेदीची नोंदणी सुरू करू असे सरकारने जाहीर केले होते त्यामुळे शेकडो शेतकरी खरेदी विक्री संघात नोंदणीसाठी आले असता खरेदी विक्री संघाला नोंदणीचे आदेशच नसल्याने आल्या पावली शेतकऱ्यांना परत जावे लागले सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याचा आरोप करीत तात्काळ नोंदणी सुरु न झाल्यास तीव्र आंदोलन छेडू असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रकाश मारोटकर यांनी दिला. राज्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन व्यापारी कवडीमोल भावाने खरेदी करीत असून शासनाने जाहीर केलेल्या हमी भावापेक्षा अर्ध्याच किमतीत खरेदी करीत असल्याने आधीच निसर्गाने शेतकऱ्यांच्या पिकांचे



अतोनात नुकसान केले आहेत त्यात सोयाबीनला भाव नसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे अशात खुद्द मुख्यमंत्री यांनी ३० ऑक्टोंबर पासून शासकीय सोयाबीनची नोंदणी करण्यात येईल त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांनी खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात नोंदणी करिता आले असतात त्यांना आल्या पावली परत जावे लागले यावेळी शेतकऱ्यांनी सरकार विरोधात प्रचंड रोष व्यक्त केला शासनाचे खरेदी विक्री संघाला नोंदणी करण्याचे आदेश नसल्याने खरेदी विक्री नोंदणी करू शकत नसल्याचे उपस्थित सचिव अमोल खंडारे यांनी सांगितले यावर बाजार समितीचे सचिव अमोल मोहाड, तहसीलदार अश्विनी जाधव यांच्याशी प्रकाश मारोटकर यांनी भ्रमणध्वनी वरून संपर्क केला असता याबाबत त्यांनाही आदेश नसल्याचे सांगितले अखेर शेतकऱ्यांना आल्या पावली परत जावे लागले त्यामुळे तात्काळ शासकीय खरेदी सुरू करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रकाश मारोटकर यांनी दिला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन रिठे व शेकडो शेतकरी उपस्थित होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत